
रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक १७४
www.ramprahar.com
◆ शनिवार, १० जानेवारी २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

नवी मुंबईत कारमध्ये १६ लाखांची रोकड पकडली/२
कर्जतमध्ये एकाच दिवशी ६२ वनराई बंधारे साकारले/५
उरणची नेमबाज अवनी कोळीकडून पदकांचा वेध/८

### ‘भारत ही जगातील सर्वात तेजीने वाढणारी अर्थव्यवस्था’




**नवी दिल्ली :** संयुक्त राष्ट्रांच्या आर्थिक आणि सामाजिक व्यवहार विभागाने २०२५-२६मध्ये भारताचा विकास दर ७.४ टक्के राहण्याचा अंदाज वर्तविला आहे. २०२४-२५मध्ये हा दर ७.१ दशांश टक्के होता. जगातील इतर सर्व देशांच्या तुलनेत हे दर सर्वाधिक आहेत. नागरिकांकडून होत असलेली खरेदी, सरकारकडून होत असलेली गुंतवणूक यामुळे हा विकासदर एवढ्या मोठ्या प्रमाणात असेल असे वर्ल्ड इकॉनॉमिक सिच्युएशन अ‍ॅण्ड प्रॉस्पेक्ट्स अहवालात संयुक्त राष्ट्रांनी म्हटले आहे. नजीकच्या काळात झालेल्या कर सुधारणा, रिझर्व्ह बँकेकडून व्याजदरात झालेली कपात याचाही फायदा अर्थव्यवस्थेच्या वाढीला मिळू शकतो, असे यात नमूद आहे. आगामी दोन आर्थिक वर्षात भारताचा विकास दर ६.६ टक्के आणि ६.७ दशांश टक्के राहण्याची शक्यता आहे. या कालावधीतसुद्धा जगातील इतर देशांच्या तुलनेत भारताचा विकास दर अधिकच असेल.

# पनवेल मनपावर महायुतीचा झेंडा फडकणार

## शिवसेना नेते शहाजीबापू पाटील यांचा विश्वास






**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

येत्या १६ जानेवारीला पनवेल महापालिकेवर महायुतीचा झेंडा फडकून विजयाचा गुलाल उडणार आहे. विरोधकांचा मागमूसही उरणार नाही, अशा शब्दांत शिवसेनेचे ज्येष्ठ नेते आणि माजी आमदार शहाजीबापू पाटील यांनी फटकेबाजी केली. निवडणुकीच्या रणधुमाळीत महायुतीच्या प्रचारासाठी गुरुवारी (दि. ८) कळंबोली येथे जाहीर सभा आयोजित करण्यात आली होती. या वेळी पाटील यांनी आपल्या खास शैलीत विरोधकांचा समाचार घेत महायुतीच्या कार्यकर्त्यांमध्ये नवा उत्साह भरला.

भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी, आरपीआय महायुतीचे प्रभाग क्रमांक ८मधील अधिकृत उमेदवार बबन मुकादम, रामदास शेवाळे, बायजा बारगजे आणि सायली सरक यांच्या प्रचारार्थ कळंबोली येथे भव्य सभा झाली. या सभेला खासदार श्रीरंग बारणे, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार विक्रांत पाटील, भाजप भटके विमुक्त आघाडीचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष बबन बारगजे, महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्ष प्रिया मुकादम, शिवसेनेचे विनोद साबळे, तुकाराम सरक यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सभेला संबोधित करताना शिवसेना नेते शहाजीबापू पाटील यांनी गुलालाची पोती घेऊन तयार रहा असे म्हणत विजयाची खात्री व्यक्त केली. महायुतीच्या या वादळासमोर विरोधकांचे अस्तित्व संपेल आणि १६ तारखेला मतमोजणीच्या दिवशी केवळ महायुतीचाच विजयोत्सव साजरा होईल, असा ठाम विश्वास व्यक्त केला. (पान २ वर..)



# महायुतीच्या प्रचारार्थ केंद्रीय मंत्री सुरेश गोपी यांच्या बैठकांचा धडाका

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका निवडणुकीच्या धामधुमीत केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू राज्यमंत्री आणि प्रसिद्ध अभिनेते सुरेश गोपी यांच्या उपस्थितीत खारघर, कळंबोली, कामोठे आणि नवीन पनवेल येथे प्रभाग क्रमांक ४ ते १६मधील भाजप महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ गुरुवारी (दि. ८) बैठका झाल्या.

या विविध बैठकांना माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, जितेंद्र म्हात्रे, रमेश नायर आदी उपस्थित होते.

आपल्या भाषणात केंद्रीय मंत्री सुरेश गोपी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारच्या योजनांचा आढावा मांडला. विशेषतः उज्ज्वला योजना आणि नैसर्गिक वायू क्षेत्रातील प्रगतीमुळे सर्वसामान्य महिलांचे जीवन कसे सुसह्य झाले आहे यावर त्यांनी भर दिला. पनवेलचा विकास हा केवळ स्थानिक प्रश्न नसून तो विकसित भारताच्या स्वप्नाचा एक भाग आहे, असेही ते म्हणाले.

या बैठकांवेळी भाजपच्या माजी जिल्हा सचिव संध्या शरबिद्रे, यमुना प्रकाशन, खारघर महिला मोर्चा अध्यक्ष साधना पवार, मधुमिता जेना, गायत्री दुबे, गायत्री महापात्रा, प्रिया दळवी, रेखा सिंग, निर्मला यादव, सक्केल बोडाई, निलम विशपुते, योगिंद्र कोट्टारे, भाजप दक्षिण सेल अध्यक्ष खारघर नवीन हेगडे, तामिळ सेलचे प्रभारी एन.एस. मुरूगन, मनोहर नक्का, रामा कृष्णन, जयप्रकाश, श्यामला सुरेश शेट्टीगर, अ‍ॅड. सविना बंगेरा, मारी कुमार, शशिधरन नायर, टी.व्ही. टायहोमस, रॉय वर्गीस, लीना प्रेमानंद, श्री. राजय्या, सरस्वती गणेश, मंजू विनोद, श्रीनिवास संपत यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. (पान २ वर..)

### दक्षिण भारतीय नागरिकांशी संवाद

नवीन पनवेलसह कामोठे, कळंबोली आणि खारघर परिसरात मोठ्या प्रमाणात दक्षिण भारतीय नागरिक वास्तव्यास आहेत. केंद्रीय मंत्री सुरेश गोपी यांनी या बांधवांशी त्यांच्या मातृभाषेत संवाद साधला. केंद्र सरकारने ज्या पद्धतीने विकासाची गंगा घराघरात पोहचवली आहे, त्याचप्रमाणे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून सुरू असलेल्या विकासकामांची गती कायम ठेवण्यासाठी पनवेलमध्ये महायुतीची सत्ता असणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन मंत्रीमहोदयांनी केले.

# घोडबंदर घाटात १४ वाहने धडकली

**ठाणे : प्रतिनिधी**



ठाण्यातील अत्यंत वर्दळीच्या घोडबंदर रोडवरील गायमुख घाटाच्या उतरणीवर शुक्रवारी (दि.९) सकाळी एका कंटेनरमुळे १४ वाहनांचा विचित्र अपघात झाला. त्यामुळे येथे प्रचंड वाहतूक कोंडी झाली होती.

मिळालेल्या माहितीनुसार ठाण्याच्या दिशेने सिमेंट वाहतूक करणाऱ्या कंटेनर चालकाचे घाटाच्या उतारावर नियंत्रण सुटले. त्याने समोरून येणाऱ्या (बोरीवलीकडे) अनेक वाहनांना जोरदार धडक दिली. या अपघातात सुदैवाने कोणतीही जीवितहानी झालेली नाही, मात्र चार जण जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी ओवळा येथील टायटन रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे, तर किरकोळ जखमी झालेल्या काहीजणांनी स्वतःच खासगी रुग्णालयात उपचार घेतल्याचे समजते. दरम्यान, अपघातानंतर चालक फरार झाला असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत.

# सुवर्णकार समाजाचा भाजप महायुतीला पाठिंबा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी भाजप महायुतीच्या उमेदवारांना नवी मुंबई सुवर्णकार विकास मंडळाने आपला पाठिंबा जाहीर केला आहे. या संदर्भातील पाठिंबापत्र नवी मुंबई सुवर्णकार विकास मंडळाचे अध्यक्ष छोटूलाल मोरे यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडे सुपूर्द केले आहे.

खारघर, कळंबोली, नावडे, तळोजा, कामोठे, खांदा कॉलनी, पनवेल, नवीन पनवेल व परिसरातील नवी मुंबई सुवर्णकार विकास मंडळाचे सभासद व त्यांचे कुटुंबीय बंधू भगिनींतर्फे महायुतीच्या उमेदवारांना जाहीर पाठिंबा देत आहोत, असे या पाठिंबापत्रात म्हटले आहे.

## निवडक

### हिमाचल प्रदेशमध्ये बस दरीत कोसळून आठ प्रवाशांचा मृत्यू

**सिरमौर :** हिमाचल प्रदेशातील सिरमौर जिल्ह्यातील संगडाह उपविभागातील हरिपूरधार येथे शुक्रवारी (दि. ९) दुपारी ३च्या सुमारास एक खासगी बस खोल दरीत कोसळली. या भीषण अपघातात आठ जणांचा जागीच मृत्यू आणि अनेक प्रवासी जखमी झाले आहेत. ही बस कुपवीहून शिमल्याच्या दिशेने जात होती. बसमध्ये सुमारे ३६हून अधिक प्रवासी होते, ज्यामुळे मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

### ‘दशावतार’सह चार चित्रपट ऑस्करच्या सर्वसाधारण श्रेणीत

**नवी दिल्ली :** कांतारा-द लिजंट चॅप्टर १, तन्वी द ग्रेट, महावतार नरसिम्हा, टुरिस्ट फॅमिली आणि सिस्टर मिडनाइट हे पाच भारतीय चित्रपट ऑस्कर पुरस्काराच्या उत्कृष्ट चित्रपट श्रेणीसाठी पात्र ठरले आहेत. अकादमी ऑफ मोशन पिक्चरने ही घोषणा केली. याशिवाय दशावतार, महामंत्रा, पेपर फ्लॉवर, पारो हे चार चित्रपट सर्वसाधारण श्रेणीसाठी पात्र आहेत. या सर्व चित्रपटांमधून नामांकित झालेल्या चित्रपटांची यादी २२ जानेवारी जाहीर होईल. भारताकडून आंतरराष्ट्रीय चित्रपट श्रेणीसाठी ‘होमबाऊंड’चे नामांकन करण्यात आले आहे.

# उद्धव ठाकरे बाळबोध बोलतात

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचा पलटवार



**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईचा महापौर हिंदू, मराठी असेल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. याच वाक्याचा आधार घेऊन संयुक्त मुलाखतीत माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी मराठी आणि हिंदू म्हणजे काय? हा प्रश्न विचारला होता. त्याला मुख्यमंत्री फडणवीस यांनी एका मुलाखतीमध्ये उत्तर दिले आहे.

‘उद्धव ठाकरे कधी कधी इतकं बाळबोध बोलतात, की त्याला काय उत्तर द्यावं समजत नाही. मुख्यमंत्री राहिलेला माणूस इतकं बाळबोध बोलतो. मूळात आपण जर पाहिलं तर दोन गुजराती वगैरे जे काही म्हणत आहेत त्यावर एक त्यांनी लक्षात घेतलं पाहिजे की, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे जन्माला गुजरातमध्ये आले, खासदार उत्तर प्रदेशचे आहेत आणि देश चालवत आहेत दिल्लीहून, ही त्यांची क्षमता आहे. काश्मीर ते कन्याकुमारीपर्यंत नरेंद्र मोदी कुठेही गेले तर किमान ५० हजार लोक जमतात, याला लीडरशिप म्हणतात. ती घरी बसून तयार होत नाही. जनतेत जाऊन लीडरशिप तयार करावी लागते. मोदींची असूया उद्धव ठाकरेंना का वाटते? इतक्या गोष्टी आपल्या मनात ठेवून असं बोलायचं याला काही अर्थ नाही’, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

मराठी आणि हिंदू महापौर विषय का आला हे सांगतो, कृपाशंकर सिंह हे मीरा भाईंदरमध्ये गेले, तिथे त्यांना विचारणा झाली की, उत्तर भारतीय इथे जास्त प्रमाणात राहतात, आमचा महापौर कधी होईल? त्यावर ते असे म्हणाले, तुम्ही इतके नगरसेवक निवडून द्या की, जे उत्तर भारतीय असतील त्या दिवशी महापौर बनेल. ते स्टेटमेंट मुंबईत आणलं आणि असे तुटून पडले की, उत्तर भारतीय पाकिस्तानातूनच आले आहेत. (पान २ वर..)

# भविष्यातही विकासाचा वेग कायम राहील

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांची ग्वाही; खारघरमध्ये महायुतीचा प्रचार

**खारघर : रामप्रहर वृत्त**



खारघर शहर विकासाच्या दृष्टिकोनातून अत्यंत वेगाने प्रगती करत आहे. नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्या सोडवण्याचा ठाम दृष्टिकोन समोर ठेवून आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली भाजप महायुती सातत्याने कार्यरत आहे. भविष्यातही विकासकामांचा हा वेग असाच कायम राहील, अशी ग्वाही माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी खारघरमध्ये प्रचारावेळी दिली.

पनवेल महानगरपालिका निवडणुकीचा प्रचार आता अंतिम टप्प्यात आला असून महायुतीने आपली पूर्ण ताकद लावली आहे. खारघर प्रभाग क्रमांक ६मधील महायुतीचे अधिकृत उमेदवार नरेश गणपत ठाकूर, समीर कदम, सोनल नवघरे आणि उषा अडसुळे यांच्या प्रचारार्थ सेक्टर १८ मधील गुरूकुल सोसायटीत प्रचार सभेचे आयोजन करण्यात आले होते.

निवडणुकीच्या रणधुमाळीत लोकनेते रामशेठ ठाकूर स्वतः मैदानात उतरल्याने कार्यकर्त्यांमध्ये मोठा उत्साह दिसून येत आहे. सेक्टर १८मधील प्रचार फेरी आणि कोपरा सभेस नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. भाजपचे ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, जितेंद्र म्हात्रे यांच्यासह भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, आरपीआय महायुतीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी खारघरच्या पायाभूत सुविधा उपलब्ध करून शहराचा कायापालट केला आहे. विकासाचा हा वारसा पुढे नेण्यासाठी प्रभाग ६मधील महायुतीच्या चारही उमेदवारांना भरघोस मतांनी विजयी करावे, असे आवाहन या वेळी करण्यात आले.



**पनवेल : येथील महापालिका निवडणुकीत प्रभाग १मधील महायुतीचे उमेदवार विजयश्री पाटील, लीना म्हात्रे, नितेश पाटील आणि संतोष भोईर यांच्या विजयासाठी पेंधर परिसरात जनसंवाद आणि प्रचार दौरा शुक्रवारी आयोजित करण्यात आला होता. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी नागरिकांशी थेट संवाद साधला. त्यांच्यासमवेत भाजपचे ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, माजी सभागृह नेते परेश ठाकूर आदींसह महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.** (वृत्त पान ३ वर..)

# पेणमध्ये लाच मागणारा तलाठी ‘एसीबी’च्या जाळ्यात

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील कांदळे येथील जमिनीच्या सातबारा उताऱ्यावर तक्रारदार व त्यांच्या कुटुंबियांची नावे नोंद करण्यासाठी पाच हजार रुपये लाचेची मागणी केल्याप्रकरणी तलाठी महादेव सीताराम धुमाळ (वय ३४) यांच्याविरोधात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने कारवाई केली.

तक्रारदार यांची कांदळे येथे सर्व्हे नं. ८९ ही जमीन आहे. या जमिनीच्या सातबारा उताऱ्यावर वारस म्हणून स्वतःचे आणि कुटुंबियांचे नाव लावण्यासाठी त्यांनी तलाठी कार्यालयात अर्ज केला होता. हे काम करण्यासाठी तलाठी महादेव धुमाळ यांनी तक्रारदाराकडे पाच हजार रुपयांची लाच मागितली. लाच देण्याची इच्छा नसल्याने तक्रारदाराने २२ डिसेंबर रोजी एसीबी अलिबाग यांच्याकडे तक्रार केली होती.

एसीबीने तक्रारीची शहानिशा करण्यासाठी २२ डिसेंबर रोजी पडताळणी केली. या वेळी आरोपी लोकसेवक महादेव धुमाळ यांनी स्वतःसह मंडळ अधिकाऱ्यासाठी पाच हजार रुपयांची लाच मागितल्याचे मोबाईल कॉलवरील संभाषण आणि प्रत्यक्ष भेटीत पंचांसमोर स्पष्ट झाले. या लाचेच्या मागणीला दुजोरा मिळाल्यानंतर एसीबीने कायदेशीर बाबी पूर्ण करून गुरुवारी रात्रीच्या पेण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला.

दरम्यान, कोणत्याही लोकसेवकाकडून लाच मागितली जात असल्यास किंवा भ्रष्टाचाराबाबत माहिती असल्यास तत्काळ आमच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना करण्यात आले आहे.

# प्रचारासाठी एआयसह डिजिटल माध्यमांचा वापर

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील महानगरपालिका निवडणुकीच्या प्रचाराला आता वेग आला आहे. उमेदवार तसेच सर्व पक्षांचे नेते मतदारांपर्यंत पोहचण्यासाठी डिजिटल उपकरणे, तंत्रज्ञानासह विविध माध्यमांचा उपयोग करत आहेत.

पदयात्रा, रॅली आणि सभा या पारंपरिक पद्धतींसह निवडणूक प्रचारात आता एआय अर्थात कृत्रिम बुद्धिमत्तेचाही समावेश झाला आहे. पुणे महापालिका निवडणुकीसाठी प्रचार करण्यासाठी भाजपने एआयचा वापर करून केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध कल्याणकारी योजना मतदारापर्यंत पोहचवण्याची मोहीम सुरू केली आहे. काँग्रेसही समाजमाध्यमाद्वारे मतदारांशी डिजिटल संपर्क साधत आहे. समाजमाध्यम व्यासपीठांचा वापर करीत विविध पक्षांचे उमेदवार चित्रफीत, रिल आणि मेसेजद्वारे प्रचार करत असल्याचे चित्र आहे.

# बालविवाहासारख्या सामाजिक कुप्रथेला आळा घालण्याचा निर्धार

**कर्जत : प्रतिनिधी**



बालविवाह ही समाजाच्या प्रगतीला अडथळा ठरणारी गंभीर सामाजिक समस्या असून त्याचा थेट परिणाम मुलींच्या शिक्षणावर, आरोग्यावर आणि भविष्यातील आयुष्यावर होत आहे. ही कुप्रथा रोखण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने जागरूक होणे अत्यंत आवश्यक आहे.

याच उद्देशाने जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय रायगड-अलिबाग आणि एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांच्या संयुक्त विद्यमाने निवासी आदिवासी आश्रम शाळा, भालीवाडी येथे बाल विवाहमुक्त भारत अभियान अंतर्गत जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

हा कार्यक्रम जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी श्रीकांत हावळे यांच्या मार्गदर्शनाखाली व जिल्हा बाल संरक्षण अधिकारी सुजाता सपकाळ यांच्या नेतृत्वाखाली पार पडला.

यावेळी चाईल्ड हेल्पलाईन जिल्हा प्रकल्प समन्वयक प्रकाश पवार यांनी बालहक्क, चाईल्ड हेल्पलाईन १०९८, बाल विवाह प्रतिबंधक कायदा तसेच पोक्सो कायदा याबाबत सविस्तर माहिती देत मुलींशी थेट संवाद साधला. कायदे माहित असणे हे स्वतःच्या संरक्षणासाठी किती आवश्यक आहे, यावर त्यांनी भर दिला.

तालुका सहाय्यक संरक्षण अधिकारी अस्मिता खंडागळे यांनी कौटुंबिक हिंसाचार कायदा, जिल्हा महिला व बाल विकास विभागाच्या विविध योजना तसेच सखी वन स्टॉप सेंटर समुपदेशन केंद्राच्या माध्यमातून महिलांना व मुलींना मिळणाऱ्या मदतीची माहिती दिली. गरज भासल्यास मदतीसाठी पुढे येण्याचे आवाहनही त्यांनी केले.

या कार्यक्रमाला शाळेचे मुख्याध्यापक शिक्षक, शिक्षिका, वस्तीगृहाचे अधीक्षक व अधीक्षिका तसेच इतर कर्मचारी उपस्थित होते. सुमारे ५०० आदिवासी मुलींनी या उपक्रमात सहभाग घेतला.बालविवाह रोखणे, मुलींचे हक्क जपणे आणि सुरक्षित, सशक्त भवितव्य घडवणे यासाठी समाजाने एकत्रितपणे पुढे येण्याची गरज आहे, असा प्रभावी संदेश या जनजागृती कार्यक्रमातून देण्यात आला.

## उमेदवारांना जाहिरातींसाठी महापालिकेची परवानगी अनिवार्य

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महापालिकेच्या ७८ जागांसाठी होणाऱ्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले आहेत. आता प्रचाराची रणधुमाळी उडत आहे. या निमित्ताने डिजिटल प्रचार करणाऱ्या उमेदवारांसाठी 'निवडणूक आयोग'ने काही बंधने घातली आहेत. 'निवडणूक आयोग'च्या सूचनेनुसार आता कोणत्याही उमेदवाराला किंवा राजकीय पक्षाला डिजिटल आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमांवर जाहिरात करताना महापालिकेच्या 'माध्यम प्रमाणन-संनियंत्रण समिती'ची पूर्वपरवानगी घेणे अनिवार्य करण्यात आले आहे.

निवडणूक अधिकारी तथा महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांनी डिजिटल माध्यमांमध्ये जाहिरात प्रसारणाच्या कार्यपध्दतीबाबत माहिती दिली आहे. डिजिटल माध्यमांमध्ये केल्या जाणाऱ्या जाहिरातींसाठी संबंधित उमेदवार आणि पक्षांना 'माध्यम प्रमाणन-संनियंत्रण समिती'कडे अर्ज करावा लागणार आहे.

या अर्जानुसार परवानगी घेतल्यावरच जाहिरात प्रसारित करण्याची मुभा दिली जाणार आहे. उमेदवारांनी जाहिरात प्रसारित करावयाच्या दिनांकापूर्वी किमान ५ दिवस आधी 'समिती'कडे 'निवडणुकीच्या प्रयोजनार्थ प्रसारमाध्यम संनियंत्रण-जाहिरात प्रमाणान आदेश २०२५' या राजपत्रातील 'परिशिष्ट ४' नुसार अर्ज करणे आवश्यक आहे. या अर्जासोबत 'परिशिष्ट ५' मधील प्रतिज्ञापत्र आणि जाहिरातीची प्रत २ प्रती पेन ड्राईव्हमध्ये सांक्षांकित केलेल्या दोन मुद्रित प्रतींसह जमा करावी लागेल.

या अर्जाचे नमुने पनवेल महारपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर तसेच 'माध्यम उमेदवारांना सूचना प्रमाणन-संनियंत्रण समिती कार्यालयात उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. निवडणूक प्रचारासाठी वापरल्या जाणाऱ्या फेसबुक, इन्स्टाग्राम, व्हॉटस्अॅप, युट्युब, इन्स्टाग्राम यासारखी समाज माध्यमे, दूरदर्शन, केबल वाहिन्या, सिनेमागृह, सार्वजनिक ठिकाणचे ऑडिओ-व्हिज्युअल डिस्प्ले, ई-वृत्तपत्रे अशा सर्व प्रकारच्या माध्यमांद्वारे निवडणूक काळात पक्षीय आणि उमेदवारांकडून केल्या जाणाऱ्या जाहिरातींसाठी सदर बंधने घालण्यात आली आहेत.

निवडणूक अधिकारी तथा आयुक्तांच्या अध्यक्षतेखालील सदर समिती अर्जाची छाननी करुन कार्यालयीन ३ दिवसांच्या आत त्यावर निर्णय देईल. 'समिती'ने जाहिरातीमध्ये काही बदल किंवा दुरुस्ती सुचविल्यास संबंधित उमेदवार किंवा पक्षावर त्याचे पालन करणे बंधनकारक असेल, जर 'समिती'ने जाहिरातीला पूर्वप्रमाणन दिले नसेल.

तर अशी जाहिरात कोणत्याही माध्यमाद्वारे प्रसिध्द करता येणार नाही, असेही आयुक्त चितळे यांनी स्पष्ट केले आहे.

## पनवेल पोलिसांनी देशी दारू विकणाऱ्यांवर केली कारवाई

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पनवेल शहर पोलिसांनी देशी दारू विकणाऱ्यांवर कारवाई करून हजारो रुपये किमतीची देशी दारू जप्त केली आहे.

पनवेल महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांनी शहरात कोम्बिंग ऑपरेशन राबवून अवैध धंदे, गुन्हेगार, एनडीपीएस, अवैध शस्त्राबाबत कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्यानांतर्गत विशेष पथकाने शहरातील करंजाडे छापा टाकून त्याच्या कडून विना परवाना विकत असलेली जवळपास ६०० रुपये किमतीची देशी दारू हस्तगत केली आहे. त्याच प्रमाणे पळस्पे येथील एका पानटपरी वर छापा टाकून त्याच्या कडे असलेली ९०० रुपये किमतीची देशी दारू हस्तगत केली आहे. या धडक कारवाई मुळे बेकायदेशीर व्यवसाय करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

## राष्ट्रीय युवा दिनानिमित्त पनवेलमधील शांतीवन येथे कायदेविषयक जनजागृती कार्यक्रम

**नवीन पनवेल :** जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच तालुका विधी सेवा समिती, पनवेल यांच्या माध्यमातून हिंदी विद्या प्रचार समितीचे लॉ कॉलेज, घाटकोपर यांच्या राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) शिबिराच्या निमित्ताने शांतीवन, नेरे येथे राष्ट्रीय युवा दिनानिमित्त कायदेविषयक जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सन्माननीय न्यायाधीश अभिव्यक्ती बडगुजर, द्वितीय दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर), पनवेल या उपस्थित होत्या. त्यांनी कायद्याचे शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांसमोर भविष्यात उभ्या राहणाऱ्या आव्हानांचा सखोल आढावा घेत, कोणती कृतीशील व सकारात्मक पावले उचलणे आवश्यक आहे याबाबत विविध उदाहरणांच्या साहाय्याने मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी केवळ शैक्षणिक ज्ञानापुरते मर्यादित न राहता सामाजिक बांधिलकी जपत जबाबदार नागरिक म्हणून कार्य करावे, असे मौलिक विचार त्यांनी मांडले.

या कार्यक्रमास महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. मधुरा कलमकर, अॅड. स्वाती सोनवणे (रिटेनर डव्होकेट), अॅड. दिपाली बोहरा (पॅनल डव्होकेट) तसेच पी.एल. व्ही. शैलेश कोंडसकर यांनी उपस्थित राहून विविध कायदेविषयक व सामाजिक विषयांवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच या वेळी पॅनल अॅड. सुयश कामेरकर, अॅड. पौर्णिमा सुतार, अॅड. प्रज्ञा भगत, अॅड. नागेश हिरवे, अॅड. विकी दुसिंग तसेच पी.एल.व्ही. सुदर्शन गोवारी आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली. सुमारे ८० विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला. कायदेविषयक जनजागृतीसह युवकांमध्ये सामाजिक व कायदेशीर जाणीव निर्माण करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरला.

## नवी मुंबईत कारमध्ये १६ लाखांची रोकड पकडली

**नवी मुंबई : बातमीदार**

वाशी येथे एपीएमसी मार्केटजवळील चेक पोस्टवर एका कारमध्ये १६ लाख १६ हजार इतक्या किमतीची रोकड शुक्रवारी (दि.९) नवी मुंबई महापालिका निवडणूक पथकाने पकडली. हे पैसे कोठून व कशासाठी आणले याची तपासणी केली जात आहे.

आदर्श आचारसंहितेचे काटेकोर पालन होण्याच्या दृष्टीने राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या आदेशानुसार नवी मुंबई महापालिकेने शहरात प्रवेशाच्या तसेच मुख्य विविध नऊ ठिकाणी २७ स्थिर संनिरीक्षण पथके स्थापन केलेली आहेत. या पथकांमार्फत वाहने व इतर बाबींवर लक्ष ठेवण्यात येत आहे. शुक्रवारी दुपारी साडेबारा वाजता तुर्भे विभागातील पथकाने वाशीतील अरेंजा कॉर्नर येथे एक मर्जीडीज कारची तपासणी केली. कारमध्ये एका पिशवीमध्ये रोख रक्कम आढळून आली. ही १६ लाख १६ हजारांची रोकड जप्त करण्यात आली असून याबाबत आयकर विभाग व जीएसटी विभागालाही माहिती देण्यात आली आहे.

## जेएनपीएत रिअल-टाइम, डेटा-आधारित सक्षम सागरी संचालन

**उरण : वार्ताहर**

भारतातील सर्वात मोठे कंटेनर बंदर असलेल्या जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरण यांनी आपल्या सागरी संचालनाच्या एंड-टू-एंड डिजिटलीकरणाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल टाकत सर्वसमावेशक, कागदविरहित हार्बर मॅनेजमेंट सिस्टीम कार्यान्वित केली

जेएनपीएने स्वदेशी हार्बर मॅनेजमेंट सिस्टीम आणि इंटिग्रेटेड व्हेसल ट्रॅफिकसिस्टीमचे एकत्रीकरण करून रिअल-टाइम, डेटा-आधारित सागरी संचालन सक्षम केले पायलट थागवल पद्वारे बंदर परिसंस्थेमधील जहाज हालचाली आणि पायलटेज कार्यप्रवाहांचे डिजिटलीकरणक केले आहे.

सागरी संचालनातील विस्तृत स्वरूप आणि डेटा सुरक्षेचे महत्त्व लक्षात घेऊन जेएनपीएने मानक स्वरूपातील उपलब्ध उपाय स्वीकारण्याऐवजी बंदरे, जलमार्ग आणि किनारपट्टीसाठी राष्ट्रीयतंत्रज्ञान केंद्र यांच्यासोबत भागीदारी करून स्वदेशी हार्बर मॅनेजमेंटसिस्टीम विकसित करण्याचा निर्णय घेतला. ही प्रणाली जहाज वेळापत्रक नियोजन, पायलटेजमाहिती, संसाधनांचे वाटप, आयओटी-आधारित इनपुट्स, सुरक्षितता निरीक्षण तसेच शाश्वततामापन यांचा एकात्मिक समावेश करून जागतिक मानकांशी सुसंगत असा एकसंध कार्यप्रवाह आहे .

याचबरोबर जेएनपीए यांनी स्वतःची स्वतंत्र आयव्हीटीएस (इंटिग्रेटेड व्हेसल ट्रॅफिक सिस्टीम)कार्यान्वित केली असून, याआधी मुंबई पोर्ट प्राधिकरणाकडून राबविण्यात आलेल्या आणिवॉर्टसिला यांच्या सेवांवर आधारित व्हीटीएस व्यवस्थेपलीकडे जाण्याचा निर्णय घेतला आहे.आयव्हीटीएस द्वारे एआयएस -आधारित जहाज माहिती संकलन आधीच सुरू झाले असून,प्रणाली पूर्णतः कार्यान्वित झाल्यानंतर ती टर्मिनल ऑपरेटर आणि सेवा पुरवठादारांनावास्तविक वेळेत कार्यरत दृश्य उपलब्ध करून देईल. यामुळे निर्णय प्रक्रिया अधिक जलद, अचूकआणि परिणामकारक होणार आहे .

या घडामोडींवर आपले मत व्यक्त करताना श्री गौरव दयाल, भा. प्र. से., अध्यक्ष, जेएनपीए,म्हणाले,लँडलॉर्ड पोर्ट मॉडेलच्या वातावरणात पारदर्शकता, कार्यक्षमता आणि सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी सागरी संचालनाचे डिजिटलीकरण अत्यावश्यक आहे. स्वदेशी पद्धतीने विकसित केलेली हार्बर मॅनेजमेंट सिस्टीम आणि रिअल-टाइम डेटा प्लॅटफॉर्म स्वीकारून जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण सर्व टर्मिनल ऑपरेटरसाठी सेवा पुरवठा अधिक सक्षम करत असून जागतिक सर्वोत्तम पद्धतींशी सुसंगतता साधत आहे. या परिवर्तनाचे सकारात्मक परिणाम सुधारित कार्यक्षमतेच्या स्वरूपात आधीच दिसून येत असून, यामुळे बंदराची स्पर्धात्मक क्षमता आणखी वाढेल. पहिल्या टप्प्यातील डिजिटलीकरणाचा भाग म्हणून, मागील सहा महिन्यांपासून वापरातअसलेल्या जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरणच्या पायलट थागवल पद्वारे आता सर्व जहाजहालचालींचा डेटा पूर्णतः डिजिटल पद्धतीने संकलित केला जात आहे. या पमध्ये मास्टरच्याडिजिटल स्वाक्षरींसह संपूर्ण पायलटेज माहिती नोंदवली जाते, अहवाल निर्मितीची सुविधाउपलब्ध आहे, तसेच हे अॅप बंदराच्या बिलिंग प्रणाली (फोकस) आणि राष्ट्रीय लॉजिस्टिक्सपोर्टल यांच्याशी एकात्मिक करण्यात आले आहे. प्रत्यक्षात माहिती नोंदविण्याचीपद्धत टप्प्याटप्प्याने बंद करण्यात येत आहे.

## मुख्य निवडणूक निरीक्षकांची माध्यम संनियत्रण कक्षास भेट

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



माध्यम प्रमाणन करण्यासाठी महापालिकेच्या मुख्यालयात माध्यम प्रमाणन व संनियंत्रण कक्ष उभारण्यात आला आहे. या कक्षास मुख्य निवडणूक निरीक्षक कैलास पगारे (भाप्रसे) व सहाय्यक निवडणूक निरीक्षक मनिषा कुंभारे यांनी बुधवारी भेट दिली. यावेळी निवडणुक अधिकारी मंगेश चितळे व महापालिका अधिकारी उपस्थित होते.

यावेळी माध्यम प्रमाणन व संनियंत्रण कक्षामधील कामकाजाची त्यांनी माहिती घेतली. यावेळी त्यांनी निवडणूक काळात दैनंदिन येणाऱ्या बातम्या, दिल्या जाणाऱ्या प्रेसनोट यांचे अवलोकन केले. माध्यम पूर्व प्रमाणान प्रक्रियेची माहिती घेऊन, आतापर्यंत देण्यात आलेल्या प्रमाणपत्रांची पहाणी केली. तसेच टि.व्हीवरील येणाऱ्या बातम्या, सोशल मिडीयावरील दृकश्राव्य जाहिरती तपासणी कशा पध्दतीने केली जाते याची माहिती घेतली तसेच पेड न्यूजबाबत माहिती घेतली.

## पान १ वरुन

### पनवेल मनपावर महायुतीचा झेंडा फडकणार

खासदार श्रीरंग बारणे यांनी आपल्या भाषणात, महायुतीने कळंबोली आणि पनवेल परिसराचा कायापालट करण्यासाठी पायाभूत सुविधांचे जाळे विणले आहे. सामान्य नागरिक, महिला आणि ज्येष्ठांसाठी राबवलेल्या विविध योजना थेट त्यांच्यापर्यंत पोहचल्या आहेत. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली सर्वांगीण विकास होत असून, येत्या १५ तारखेला मतदान करून महायुतीच्या उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन केले.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपल्या भाषणात शिक्षण संस्थांच्या नावाखाली खासगी कंपन्यांप्रमाणे कारभार करणाऱ्यांवर जोरदार टीका केली. ज्यांनी संकटकाळात जनतेला आधार देण्याऐवजी स्वतःच्या संस्थांचा फायदा पाहिला त्यांना त्यांची जागा दाखवण्याची हीच योग्य वेळ आहे, असे ते म्हणाले. शहाजीबापूंचे पनवेलमध्ये येणे हे नेहमीच विजयाचे शुभसंकेत असते, असेही त्यांनी सांगितले.

प्रचाराच्या शेवटच्या टप्प्यात महायुतीने आपली पूर्ण ताकद झोकून दिली आहे. सभेच्या ठिकाणी झालेली गर्दी आणि कार्यकर्त्यांचा उत्साह पाहता महायुतीच्या उमेदवारांच्या विजयाचे प्रतिबिंब दिसून आले.

### महायुतीच्या प्रचारार्थ केंद्रीय मंत्री सुरेश गोपी यांच्या बैठकांचा धडाका

याचबरोबर महायुतीचे प्रभाग क्रमांक ४मधील उमेदवार प्रवीण पाटील, परेशा पटेल, अनिता पाटील, मधू पाटील; प्रभाग ५चे उमेदवार शत्रुघ्न काकडे, मिनल पाटील, हर्षदा उपाध्याय, प्रवीण बेरा; प्रभाग ६चे उमेदवार उषा अडसुळे, नरेश ठाकूर, सोनल नवघरे, समीर कदम; प्रभाग ७चे उमेदवार अमर पाटील, मनाली ठाकूर, प्रमिला पाटील, राजेंद्रकुमार शर्मा; प्रभाग ८चे उमेदवार बबन मुकादम, रामदास शेवाळे, बायजा बारगजे, सायली सरक; प्रभाग ११ उमेदवार निलम मोहिते, प्रदीप भगत, चरणदीप सिंग; प्रभाग १२चे प्रभाकर कांबळे, विद्या तामखेडे, कुसूम म्हात्रे, दिलीप पाटील; प्रभाग १३ रवींद्र जोशी, विकास घरत, हेमलता गोवारी, शिला भगत आणि प्रभाग क्रमांक १६मधील संतोष शेट्टी, समीर ठाकूर, राजेश्री वावेकर, कविता चौतमोल हे उमेदवार हजर उपस्थित होते. मंत्री गोपी यांच्या उपस्थितीमुळे उत्साह पहायला मिळाला.

### उद्धव ठाकरे बाळबोध बोलतात

ज्या वेळी जलील म्हणाले की, बुरखेवाली महापौर होईल. संजय राऊत यांना प्रश्न विचारण्यात आला तेव्हा बोलता येईना. यांचे चेहरे उघडे पडले की, उत्तर भारतीय मीरा भाईंदरला म्हटल्यावर चेकाळून आमच्या अंगावर आले होते. त्यामुळे मला हे सांगावं लागलं मुंबईचा महापौर महायुतीचाच होईल, मराठीच होईल आणि हिंदूच होईल, असे म्हणत उद्धव ठाकरेंच्या आरोपांना मुख्यमंत्री फडणवीस यांनी जोरदार प्रत्युत्तर दिले.

## वऱ्हाडी साहित्यिकांना कविता संग्रह भेट

**मोहोपाडा : प्रतिनिधी**



विदर्भातील सुप्रसिद्ध जेष्ठ साहित्यिक ज्यांना आदराने वऱ्हाडी साहित्यिक म्हटले जाते असे बाबाराव मुसळे ( हल्या हल्या दुदु दे कादंबरी फेम) यांना वाशीम येथील त्यांच्या घरी जाऊन रसायनी येथील साहित्यिक कवी चारोळीकार अनिल दाभाडे यांनी आपले सांजधारा व काजवा हे दोन कविता संग्रह भेट दिले. वाशीम येथील मुळनिवाशी असलेले अनिल दाभाडे यांचे दोन्ही काव्यसंग्रह बघून व त्यामधील कविता वाचून बाबाराव मुसळे यांनी आनंद व्यक्त केला आणि पुढील लेखनासाठी शुभेच्छा दिल्या.

विदर्भ साहित्य संघ वाशीम शाखेचे अध्यक्ष प्रा.हरिभाऊ क्षीरसागर सरांनाही कवी अनिल दाभाडे यांनी सांजधारा व काजवा कविता संग्रह सप्रेम भेट दिले. यावेळी हरिभाऊ क्षीरसागर सरांनी अनिल दाभाडे या माझ्या विद्यार्थ्याने केवढी मोठी प्रगती केली असे बोलून कौतुक केले व पुढील लेखनासाठी शुभेच्छा दिल्या.

## विणेगाव येथून तरुण बेपत्ता

**मोहोपाडा :** विणेगाव येथील सुदाम लक्ष्मण धारपवार ही व्यक्ती कोणासही काहीएक न सांगता कोठेतरी निघून गेलेला आहे. याबाबत खालपूर पोलिस ठाण्यात सिमा सुदाम धारपवार यांनी त्यांचे पती सुदाम लक्ष्मण धारपवार हे मनोरुग्ण असुन घराचे जवळ असलेल्या आंब्याचे झाडा जवळुन कोणासही काहीएक न सांगता कोठेतरी निघुन गेले आहेत अशी माहिती दिली आहे.याबाबत पोलीस ठाणे येथे मनुष्य मिसींग दाखल आहे.

## दुखवटा

### दत्तात्रेय साठे



**पनवेल :** गुळसुंदे येथील ज्येष्ठ नागरिक दत्तात्रेय शंकर साठे यांचे आज (दि. ९) वृद्धापकाळाने वयाच्या ८१व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले आणि तीन मुली, असा परिवार आहे.दत्तात्रेय साठे यांनी रसायनी येथील एचओसी कंपनीमध्ये अनेक वर्षे प्रामाणिकपणे सेवा बजावली. प्रेमळ व मनमिळावू स्वभावामुळे ते सर्वपरिचित होते. त्यांचा दशक्रिया विधी रविवार, दिनांक १८ जानेवारी रोजी श्रीक्षेत्र गुळसुंदे येथे होणार असून, उत्तरकार्य बुधवार, दिनांक २१ जानेवारी रोजी गुळसुंदे येथील त्यांच्या राहत्या घरी होणार आहे.

### लिलाबाई अंबाडे



**नागोठणे :** येथील सामाजिक कार्यकर्ते विनोद अंबाडे यांच्या मातोश्री लिलाबाई मधुकर अंबाडे यांचे गुरुवार दि. ८ जानेवारी रोजी दुपारी १२.३५ वाजता हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने वयाच्या ७८व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, दोन सुना, एक मुलगी, ६ नातू, एक नात व एक नातसून असा मोठा परिवार आहे. कै.लिलाबाई अंबाडे यांची दशक्रिया विधी शनिवार दि. १७ जानेवारी रोजी उद्धर (पाली) येथे व उत्तरकार्य मंगळवार दि. २० जानेवारी रोजी खडआळी तील राहत्या घरी होणार असल्याची माहिती विनोद अंबाडे यांनी दिली आहे.

# शेकापने अनेक वर्षे खोटी आश्वासने देऊन मते मागितली

## ◆ आमदार प्रशांत ठाकूर यांचा हल्लाबोल



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शेतकरी कामगार पक्षाने अनेक वर्षे केवळ खोटी आश्वासने देऊन जनतेची मते मागितली. त्यांच्या बॅनरवर दिसणारे नेते गेल्या साडेचार वषारपासून तुरुंगात आहेत. कर्नाळा बँकेचा घोटाळा करून कमावलेल्या पैशाच्याजोरावर राज्य करण्याचा प्रयत्न त्यांचा सुरू आहे, मात्र आता त्यांचे कार्यकर्ते आणि मतदार त्यांच्यापासून दूर झाले आहेत, अशी टीका आमदार प्रशांत ठाकूर यांनी पेंधर येथे प्रभाग क्रमांक १मधील भाजप महायुतीच्याउमेदवारांच्या प्रचारावेळी केली.

पनवेल महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक १ पेंधर परिसरात भाजप-महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ जनसंवाद आणि प्रचार दौरा शुक्रवारी आयोजित करण्यात आला होते. या प्रचार दौऱ्यात महायुतीचे उमेदवार विजयश्री पाटील, लीना म्हात्रे, नितेश पाटील आणि संतोष भोईर यांच्या विजयासाठी आमदार ठाकूर यांनी पेंधर गावात घराघरांत जाऊन नागरिकांशी थेट संवाद साधला. यावेळी स्थानिकांनी त्यांचे जंगी स्वागत केले. नागरिकांनी दाखवलेला विश्वास आणि उत्साह हीच आमची खरी प्रेरणा असून पनवेलच्या सवारगीण विकासासाठी महायुती कटिबद्ध आहे, असे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले.

या दौऱ्यादरम्यान आमदार प्रशांत ठाकूर यांनी प्रभागातील प्रलंबित प्रश्न आणि भविष्यातील विकासकामांच्या नियोजनाबाबत स्थानिकांशी सविस्तर चर्चा केली. नागरिकांच्याअपेक्षा आणि सूचनांना प्राधान्य देऊन काम करण्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली. मविकासासाठी एकजूट,प्रगतीसाठी महायुतीफ असा नारा देत करण्यात आलेय या प्रचारामुले पेंधर परिसरातील राजकीय वातावरण पूर्णपणे ढवळून निघाले आहे. महायुतीच्या या शक्तीप्रदर्शनाला मतदारांकडून मिळालेला सकारात्मक प्रतिसादपाहता, प्रभाग मध्ये महायुतीचे उमेदवार भरघोस मतांनी विजयी होतील, असा ठाम विश्वास महायुतीच्याकार्यकत्यारकडून व्यक्त केला जात आहे.

याप्रसंगी यावेळी आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, माजी सभागृहनेते परेश ठाकूर, खेरणे ग्रामपंचायतीचे सरपंच शैलेश माळी, करवले गावचे माजी सरपंच गोपीनाथ पाटील, खुटरी गावातील माजी सरपंच नंदूशेठ म्हात्रे, कोयनावेळे गावचे माजी सरपंच विनेश कदम, प्रकाश भोईर, दीक्षा फाउंडेशनच्या अध्यक्षा दीक्षाताई जाधव, तालुका उपाध्यक्ष सुरेश पोरजी, प्रभाग सरचिटणीस जितेंद्र पोरजी. चिटणीस सचिन पाटील, विनोद पाटील, हरिदास पाटील, संतोष मढवी, वासुदेव मढवी, धर्मनाथ भोईर, नितीन भोईर, भगवान कोपरकर, अविक महादेव, चंद्रकांत पाटील, विश्वनाथ पाटील,अक्रम शेख, राजेश तांबोळी, अमित पोरजी, गोमेश माळी, धनंजय पोरजी, विष्णू पोरजी, बाळाराम पाटील, प्रभाग सरचिटणीस दीपक पाटील, संतोष पाटील,अशोक पाटील, किशोर म्हात्रे, वीरेंद्र पाटील, संतोष पाटील, अक्षय कदम, सदाशिव पोरजी, विनेश कदम,घोट गावातील शिवा पाटील, वृषाल पाटील, प्रभाकर पाटील, भाई प्रधान यांच्यासह परिसरातील महायुतीचेपदाधिकारी, कार्यकर्ते आणि मान्यवर उपस्थित होते.

# उरणकरवासीयांचे स्वप्न साकार!



## पीरवाडी-नागाव समुद्रकिनारा सुशोभीकरण व बंधारा कामाचा शुभारंभ

**उरण : रामप्रहर वृत्त**

उरणमधील पिरवाडी-नागाव येथे समुद्रकिनारा सुशोभीकरण व संरक्षक बंधारा बांधणी कामाचे भूमिपूजन शुक्रवारी (दि. ९) आमदार महेश बालदी यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात झाले. उरणच्या विकासाच्या दृष्टीने हा दिवस अत्यंत महत्त्वाचा ठरला आहे.

या कार्यक्रमास भाजपचे महाराष्ट्र राज्य परिषद सदस्य व नगरसेवक रवी भोईर, उरण शहर अध्यक्ष कौशिक शाह, नगरसेवक जयविंद्र कोळी, भाजप मंडळ अध्यक्ष प्रसाद भोईर, युवा मोर्चा शहराध्यक्ष निलेश पाटील, नागाव व म्हातवली ग्रामपंचायत सदस्य यांच्यासह भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### ◆ प्रकल्पाची प्रमुख वैशिष्ट्ये

***जॉगिंग ट्रॅक, आकर्षक लाइटिंग, पर्यटकांसाठी आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी बाक (बेंच) आणि मजबूत सुशोभित संरक्षक बंधारा ही प्रकल्पाची प्रमुख वैशिष्ट्य आहेत. या कामामुळे उरणला एक नवी आणि देखणी ओळख प्राप्त होणार आहे.***

गेल्या अनेक वर्षांपासून उरणकरवासीयांनी पाहिलेले सुंदर आणि सुरक्षित समुद्रकिनाऱ्याचे स्वप्न आता लवकरच प्रत्यक्षात येणार आहे. या प्रकल्पामुळे केवळ लाटांपासून किनाऱ्याचे संरक्षण होणार नाही, तर पर्यटनालादेखील मोठी चालना मिळणार आहे.

# माजी नगरसेवक राजू सोनी यांच्यामुळे कबुतराला जीवदान

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महापालिकेचे मा नगरसेवक राजू सोनी यांच्या तत्परतेमुळे कबुतराला जीवदान मिळाले आहे. शहरातील झवेरी बाजार येथील महावितरण कंपनीच्या हाय टेन्शन वर एक कबूतर अडकला आहे याची माहिती येथील व्यापारी व नागरिकांनी मा. नगरसेवक राजू सोनी यांना फोन द्वारे कळवली त्यांनी तात्काळ तेथे धाव घेऊन तेथे त्यांचे स्वीय्य सहाय्यक मंदार देसाई यांना बोलवून तेथे अग्निशमन



दल व महावितरण कर्मचारी यांना बोलवण्यास सांगितले. देसाई यांनी लगेचच अग्निशामक दल व महावितरण कंपनीचे अधिकारी व कर्मचारी यांना बोलवले. महावितरण कंपनीचे कर्मचारी येऊन जिवाची पर्वा न करता हाय टेन्शन वर चढून तात्काळ त्या लटकलेल्या कबुतराचे सुखरूप प्राण वाचवले व त्याला सोडण्यात आले. त्या मुळे येथील नागरिकांनी राजू सोनी , मंदार देसाई व महावितरण कर्मचारी यांचे कौतुक करून आभार मानले.

# सुकापुरात विविध विकासकामांचे उद्घाटन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सुकापूर परिसरात विकासकामांचा वेग कायम राखत आमदार प्रशांत ठाकूर यांचास्थानिक विकास निधीतून जनलक्ष्मी सोसायटी ते श्रीनिकेतन सोसायटी पर्यंतच्या मुख्य रस्त्याचे काँक्रीटीकरण पूर्ण करण्यात आले आहे. भारतीय जनता पार्टीने नागरिकांना दिलेले शब्द पाळत या रस्त्याचे काम पूर्ण केले असून शुक्रवारी भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या हस्ते या रस्त्याचे उदघाटन करण्यात आले.

सुकापूरच्या विकासाला नवी गती देणाऱ्या या प्रकल्पामुळे स्थानिक रहिवाशांचा प्रवासाचा प्रश्न कायमस्वरूपी सुटला आहे. याच कार्यक्रमाचे औचित्य साधत सुकापूरच्या सरपंच ज्योती रवींद्र केणी यांच्या वाढदिवसानिमित्त परिसरात नव्याने उभारण्यात आलेल्या ओपन जिमचेही उद्घाटन अरुणशेठ भगत यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी भाजप नेते संजय पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्यअमित जाधव, आकुर्ली गावाचे सरपंच सचिन पाटील, वाकडी गावाचे सरपंच नरेशपाटील, विहीघर गावातील सुनील पाटील, माजी सरपंच पांडुरंग सिताराम केणी,सरपंच ज्योती केणी, उपसरपंच दिवेश भगत, पांडुरंग केणी, अँड रविंद्र केणी,आनंद म्हसकर, सदस्य पूनम भगत, सदस्य अशोक पाटील, सदस्य महेश पाटील,सदस्य आत्माराम पाटील, सरेश पाटील, संजय पाटील, परशुराम पाटील, अनंताकेणी, मनोहर केणी, श्रीराम केणी, मधुकर पोपेटा, बाबुराव पोपेटा, कमलाकरकेणी, प्रमोद भगत, संदीप पाटील, शशिकांत पाटील, चांगदेव ठाकूर, पंढरी ठाकूर,आळुराम केणी, दत्ता पवार, विकास तळेकर, संजय म्हात्रे, अनिकेत पाटील, अक्षय पाटील, कार्यकर्ते तसेंच जनलक्ष्मी व श्रीनिकेतन सोसायटीचे पदाधिकारी उपस्थित होते.

# खान्देश सामाजिक विकास संस्थेचा भाजपला पाठिंबा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खान्देश सामाजिक विकास संस्था रायगडने पनवेल महापालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी भाजप उमेदवारांना आपला बिनशर्त पाठिंबा जाहीर केला आहे. त्यांनी या पाठिंब्याचे पत्र माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडे सुपूर्द केले. पनवेल, नवीन पनवेल, खांदा कॉलनी, कामोठे, कळंबोली, खारघर येथील सर्व मंडळे भाजपच्या उमेदवारांना जाहीर पाठिंबा देत असून सर्व उमेदवारांना निवडून आणण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे त्यांनी पाठिंबा पत्राद्वारे आश्वासित केले आहे.



# भाजपचे ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख यांचे अमृत महोत्सवी वर्षात पदार्पण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी . देशमुख यांनी आपल्या अमृत महोत्सवी वर्षात पदार्पण केले आहे. यानिमित्त गव्हाण येथील त्यांच्या निवासस्थानी अभिष्टचिंतन सोहळ्याचे गुरुवारी (दि. ८) आयोजन करण्यात आले होते.

या सोहळ्याला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून वाय. टी. देशमुख यांना वाढदिसाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी वाय. टी. देशमुख यांना उदंड आयुष्याच्या शुभेच्छा देत जुन्या आठवणींना उजाळा दिला.



या सोहळ्यावेळी भाजपचे ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, काँग्रेसचे जिल्हा अध्यक्ष महेंद्र घरत, माजी सरपंच जितेंद्र म्हात्रे, भाजपच्या जिल्हा सरचिटणीस चारुशीला घरत, निलेश खारकर, कविता भगत यांच्यासह विविध शेतातली मान्यवरांनीउपस्थिती राहून वाय. टी. देशमुख यांचे अभिष्टचिंतन केले

# निवडणुकीबाबत सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांनी निष्पक्ष आणि पारदर्शी राहून काम करावे -आयुक्त मंगेश चितळे



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महापालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ -२६ च्या अनुषंगाने निवडणूक कामी नेमणूक झालेल्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कामात कोणताही हलगर्जीपणा सहन केला जाणार नाही, त्यांनी अत्यंत दक्षतेने निष्पक्ष व पारदर्शी राहून काम करावे अशा कठोर शब्दांत सूचना निवडणूक अधिकारी तथा आयुक्त मंगेश चितळे यांनी दिल्या. महापालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ -२६च्या पार्श्वभूमीवर क्षेत्रिय अधिकारी, भरारी पथक प्रमुख, स्थायी निगरानी पथक प्रमुख व व्हिडिओग्राफी निगराणी पथक अशा सर्व पथकाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची बैठक आज महापालिका मुख्यालयात घेण्यात आली, याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी आचारसंहिता कक्ष प्रमुख तथा अतिरीक्त आयुक्त महेशकुमार मेघमाळे, खर्च संनियंत्रण कक्ष प्रमुख अधिकारी मंगेश गावडे, निवडणूक विभाग उपायुक्त नानासाहेब कामठे, आचारसंहिता कक्ष पथक समन्वयक रवीकिरण घोडके, खर्च संनियंत्रण कक्ष समन्वयक निलेश नलावडे, नोडल अधिकारी उपस्थित होते.

### विशेष कार्यकारी दंडाधिकारी

***भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ (सन २०२३ चा ४६) च्या कलम १५ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून महाराष्ट्र शासनाच्यावतीने राज्यातील संबंधित जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, यांनी महाराष्ट्र महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या प्रयोजनार्थ नियुक्त केलेले क्षेत्रिय अधिकारी, भरारी पथक प्रमुख, स्थायी निगरानी पथक प्रमुख व व्हिडिओग्राफी निगरानी पथक प्रमुख यांना दि.१५/१२/२०२५ ते दि.१६/०१/२०२६ पर्यंत, याद्वारे, विशेष कार्यकारी दंडाधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे. त्यांना भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ च्या कलम १४८, १५२,१६२ व १६३ अंतर्गत कार्यकारी दंडाधिकाऱ्याचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.***



# चिपळे येथे विविध विकासकामांचे भूमिपूजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलचे कार्यक्षम आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वात आणि भाजप महाराष्ट्र राज्य परिषद सदस्य अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या मार्गदर्शनाने तसेच पनवेल पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील यांच्या सहकार्याने चिपळे येथील रायगड जिल्हा परिषद शाळा येथील पेव्हर ब्लॉक तसेच नवीन गटार लाइन (रुपये तीन लाख) या कामाचे भूमिपूजन भाजप युवा मोर्चा तालुका सरचिटणीस विश्वजीत पाटील यांच्या उपस्थितीत शुक्रवारी (दि.९) झाले.

या कार्यक्रमास चिपळे भाजप बूथ अध्यक्ष समीर पाटील, हभप देहुमहाराज पाटील, हभप तुकाराम पाटील, विठ्ठल पाटील, हौशीराम फडके, विष्णू पाटील, शशिकांत फडके, हरिश्चंद्र म्हात्रे, मनोहर पाटील, नारायण पाटील, विशाल पाटील, एकनाथ पाटील, महेंद्र पाटील, धीरज म्हात्रे, अॅड. रोहित पाटील, प्रशांत म्हात्रे, तन्मय पाटील, निलेश पाटील, समीर पद्माकर पाटील यांच्यासह ग्रामस्थ मंडळ चिपले व चिपळाई ग्रुप चिपळे येथील कार्यकर्ते उपस्थित होते.

## संपादकीय

# जनगणनेची तयारी सुरू

देशातील आगामी जनगणनेची तयारी सुरू झाली असून मोदी सरकारने घेतलेल्या ऐतिहासिक निर्णयामुळे स्वातंत्र्यानंतर प्रथमच राष्ट्रीय पातळीवर जातनिहाय जनगणना होणार आहे. देशातील लोकसंख्येची जातवार आकडेवारी यातून समोर येणार असून मागास समाजघटकांना त्याआधारे सुयोग्य धोरणांमधून न्याय मिळू शकेल. जगातील सर्वाधिक लोकसंख्येच्या या देशातील जनगणनेतून त्याची विकासाच्या दिशेने होणारी पुढील वाटचाल रेखाटली जाणार आहे.

**गेल्या महिन्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्रीय मंत्रिमंडळाने ११ हजार ७१८ कोटी रूपये खर्चाच्या भारत जनगणना २०२७च्या योजनेला मंजुरी दिली होती. आता या जनगणनेच्या अंमलबजावणीसाठी औपचारिक अधिसूचना जारी केली गेली आहे. म्हणजेच जनगणनेची तयारी सुरू झाली असून दोन टप्प्यांत जनगणना पार पडणार आहे. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे स्वातंत्र्यानंतर प्रथमच यात राष्ट्रीय पातळीवरील जातीय जनगणनेचा समावेश असणार आहे. यापूर्वी इंग्रजांच्या काळात १९३१मध्ये जातीआधारित जनगणना झाली होती. गेली काही वर्षे प्रत्येक निवडणुकीच्या वेळी निव्वळ राजकारण म्हणून विरोधकांकडून जातिनिहाय जनगणनेचा मुद्दा काढला जात होता. परंतु स्वातंत्र्यानंतर इतकी वर्षे सत्ता ताब्यात असताना काँग्रेस पक्षाने जातिनिहाय जनगणना का केली नाही याचे उत्तर त्यांनी दिले नाही. २०११मध्ये जातनिहाय माहिती जमा करण्यात आली, परंतु ती जाहीर केली गेली नाही. अखेर मोदी सरकारनेच जातिनिहाय जनगणनेचा ऐतिहासिक निर्णय घेतला व लवकरच ती पारही पडेल. जनगणनेचा पहिला टप्पा घरगणना आणि गृहनिर्माण जनगणनेचा असेल. हा टप्पा १ एप्रिल २०२६पासून सुरू होत असून एप्रिल ते सप्टेंबर २०२६दरम्यान तो पार पडेल. ही देशातली पहिली डिजिटल जनगणना असून यात मोबाइल ॲप तसेच केंद्रीय पोर्टल वापरले जाईल. जनगणनेच्या दुसऱ्या टप्प्यात लोकसंख्या गणना केली जाणार असून ती फेब्रुवारी २०२७मध्ये सुरू होईल. लडाख, जम्मू आणि काश्मीर या केंद्रशासित प्रदेशांत तसेच हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंड या राज्यांमधील बर्फाच्छादित भागांमध्ये लोकसंख्या गणना या वर्षी सप्टेंबरमध्ये पार पडेल. घरोघरी जाऊन केल्या जाणाऱ्या गणनेच्या १५ दिवस आधी स्वयंगणनेची सुविधा उपलब्ध असेल. डिजिटल जनगणनेत अँड्रॉइड आणि आयओएस या दोन्ही प्रणालींसाठीच्या मोबाइल पचा वापर करून डेटा गोळा केला जाईल. जनगणनेच्या कामासाठी सुमारे ३० लाख क्षेत्रीय कर्मचारी तैनात केले जाणार आहेत. या सर्वांना त्यांच्या नियमित कामाव्यतिरिक्त या अतिरिक्त जबाबदारीसाठी मानधन दिले जाईल. यापूर्वीची राष्ट्रीय जनगणना २०११मध्ये झाली होती. २०२१ मध्ये व्हावयाची जनगणना कोरोना महामारीमुळे पुढे ढकलण्यात आली. २०११च्या आधी भारताची लोकसंख्या १२१ कोटी होती व त्यात सुमारे ५१.५ टक्के पुरुष, तर ४८.५ टक्के स्त्रिया होत्या. आता होणाऱ्या जातनिहाय जनगणनेमुळे लोकसंख्येतील वेगवेगळ्या समाजघटकांचे नेमके प्रमाण तसेच त्यांच्या शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक स्तराचे तपशील हाती लागतील. या आधारे पुढील धोरणांची आखणी व अंमलबजावणी करून मागास समाजघटकांना सुयोग्य न्याय देता येणार आहे. वाढलेल्या लोकसंख्येनुसार मतदारसंघांची फेररचनाही केली जाण्याची शक्यता आहे. तसेच लोकसभा आणि विधानसभांमध्ये महिलांकरिता ३३ टक्के आरक्षणाची अंमलबजावणी करण्याकरिताही जनगणनेतील आकडेवारी उपयोगाची ठरू शकेल. सर्वच दृष्टीने नेमकेपणाने ही प्रक्रिया पार पाडण्याचे आव्हान संबंधित यंत्रणेसमोर आहे.**

# गुरू तेग बहादूर साहिब यांचे ३५० शहिदी समागम शताब्दी वर्ष

हिंद की चादर श्री गुरु तेग बहादुर यांच्या ३५०व्या शहीदी समागम शताब्दी वर्षानिमित्त राज्यातील नांदेड, नागपूर व खारघर (जि.रायगड) येथे राज्य शासनाच्या अल्पसंख्याक विकास विभाग व हिंद की चादर श्री गुरु तेग बहादुर साहिब जी ३५०वी शहीदी समागम शताब्दी राज्यस्तरीय समिती, शीख-सिकलीकर, बंजारा लबाना, मोहियाल, सिंधी व इतर सर्व समाज यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे.

गुरु तेग बहादूर हे शिख धर्माचे नववे गुरू होते, त्यांना हिंद की चादर म्हणून ओळखले जाते. गुरु तेग बहादुर यांनी शिख धर्मात प्रार्थना, परोपकार, सेवा, साधेपणा, इतरांच्या सेवेला महत्त्व आणि निर्भीडपणा यांचा प्रचार केला, त्यांचे प्रवचन व भजन यांचा गुरु ग्रंथसाहिब यामध्ये देखील समावेश आहे. श्री गुरु तेग बहादुर यांनी १७व्या शतकामध्ये तत्कालीन शासनकर्त्यांच्या अन्याय व अत्याचाराविरूद्ध आवाज उठवून धर्मस्वातंत्र्य आणि मानवी हक्कांसाठी बलिदान देऊन भारताच्या सांस्कृतिक व आध्यात्मिक अस्मितेचे रक्षण केले. त्यांच्या बलिदानामुळे संपूर्ण भारतात तसेच शिख धर्मात शौर्य आणि त्यागाची परंपरा अधिक मजबूत झाली. मुघल सम्राटांच्या विरोधात जाऊन भाई लकीशा बंजारा यांनी नववे गुरू तेग बहादूर यांच्या पवित्र शरीरास आपला तांडा व घर जाळून अग्नी दिला. या बाबीस भारतीय इतिहासात अनन्य साधारण महत्त्व आहे.

गुरू तेग बहादूर यांचे सन २०२५ हे ३५०वे शहिदी समागम शताब्दी वर्ष असल्याने त्यांचा गौरवशाली इतिहास सर्वांना माहीत व्हावा तसेच त्यांनी केलेला प्रचार व दिलेले बलिदान याचे स्मरण होण्याकरिता विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्याकरिता हिंद-की-चादर गुरू तेग बहादूर साहिब जी ३५०वी शहिदी समागम शताब्दी तसेच गुरु गोविंदसिंग, गुरु-ता-गद्दी समागम समिती यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विनंती केली. त्यानुषंगाने मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली १३ जून रोजी हिंद-की-चादर गुरू तेग बहादुर साहिबजी ३५० वी शहिदी समागम शताब्दी तसेच गुरू गोविंदसिंग, गुरू-ता-गद्दी समागम समितीची याबाबत बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीच्या अनुषंगाने विविध कार्यक्रमांचे आयोजन करणे तसेच कार्यक्रमाच्या आयोजनाकरिता, राज्यस्तरीय समन्वय समिती, क्षेत्रीय आयोजन समिती व विविध कार्यक्रम आयोजन व्यवस्था समिती इ. समित्या १२ ऑगस्ट रोजीच्या शासन निर्णयान्वये स्थापन करण्यात आल्या आहेत.

हिंद की चादर गुरू तेग बहादूर यांच्या ३५०व्या शहीदी समागम शताब्दी वर्षानिमित्त राज्यातील नांदेड, नागपूर व खारघर येथे राज्य शासनाच्या अल्पसंख्याक विकास विभाग व हिंद की चादर गुरू तेग बहादूर साहिब जी ३५०वी शहिदी समागम शताब्दी राज्यस्तरीय समिती, शीख-सिकलीकर, बंजारा लबाना, मोहियाल, सिंधी व इतर सर्व समाज यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे.

कार्यक्रमाचे ठिकाण व त्यात समाविष्ट असलेले जिल्हे

नांदेड - छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, जालना, लातूर, धाराशिव, हिंगोली, बीड, नंदुरबार, धुळे, जळगाव.

नागपूर - वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली, अकोला, अमरावती, बुलढाणा, यवतमाळ, वाशिम.

नवी मुंबई - मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, अहिल्यानगर, नाशिक.

हिंद की चादर गुरू तेग बहादूर यांच्या ३५०व्या शहिदी समागम शताब्दी वर्षानिमित्त राज्यातील नांदेड, नागपूर व नवी मुंबई, खारघर येथे राज्य शासनाच्या अल्पसंख्याक विकास विभाग व हिंद की चादर गुरू तेग बहादूर साहिबजी ३५०वी शहिदी समागम शताब्दी राज्यस्तरीय समिती शीख-सिकलीकर, बंजारा लबाना, मोहियाल, सिंधी व इतर सर्व समाज यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे.

हिंद की चादर गुरू तेग बहादूर साहिब जी यांच्या ३५०व्या शहिदी समागम शताब्दी वर्षानिमित्त नांदेड, नागपूर व खारघर येथे आयोजित करण्यात येणाऱ्या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाकरिता आवश्यक शिफारशी करण्यासाठी नांदेड, नागपूर व खारघर या तीन ठिकाणी क्षेत्रीय आयोजन समिती स्थापन करण्यात आली आहे.

क्षेत्रीय आयोजन समितीची कार्यकक्षा :- खारघर या ठिकाणी होणाऱ्या कार्यक्रमांच्या आयोजनाकरिता वेळोवेळी आढावा घेवून कालबद्ध कार्यक्रम निश्चित करणे, कार्यक्रमाच्या अनुषंगाने मार्गदर्शक समिती तसेच आयोजन व्यवस्थापन समित्या स्थापन करण्यासाठी जिल्हास्तर आयोजन व व्यवस्थापन समितीस शिफारस करून त्यांची वेळोवेळी आढावा बैठक घेणे व त्याची माहिती राज्यस्तरीय समितीस व अल्पसंख्याक विकास विभागास सादर करणे.

या कार्यक्रमाचे योग्य नियोजन, परिणामकारक अंमलबजावणी याकरिता आयोजन समन्वय समिती, व्हीआयपी व्यवस्थापन समिती, सभागृह व्यवस्थापन समिती, प्रशासन व्यवस्थापन समिती, मैदान व्यवस्थापन समिती, मंडप व्यवस्थापन समिती, बैठक व स्वागत व्यवस्थापन समिती, अतिथी व्यवस्थापन समिती, निवास व्यवस्थापन समिती, नाव नोंदणी व्यवस्थापन समिती, प्रदर्शनी व्यवस्थापन समिती, प्रचार व प्रसार व्यवस्थापन समिती, दक्षता व्यवस्थापन समिती, महिला सुरक्षा व्यवस्थापन समिती, आपात्कालीन व्यवस्थापन समिती, पाणीपुरवठा व्यवस्थापन समित्ती, स्वच्छता व्यवस्थापन समिती, स्वरुपा व्यवस्थापन समिती, सार्वजनिक परिवहन व्यवस्थापन समिती, जूताघर व्यवस्थापन समिती, लंगर व्यवस्थापन समिती तसेच स्थानिक कार्यक्रमाच्या अनुषंगाने आवश्यकता असलेल्या समित्या स्थापन करण्यासाठी जिल्हास्तर आयोजन व व्यवस्थापन समितीस शिफारस करणे.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२५१०१०१८५९४२७८१४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

**-मनोज सानप, रायगड जिल्हा माहिती अधिकारी**

# आज जागतिक हिंदी दिवस

१० जानेवारी हा दिवस जगभरातील हिंदी साधकांसाठी खूप खास दिवस आहे, कारण या दिवशी जागतिक हिंदी दिन साजरा केला जातो. जगभरात हिंदी भाषेचा प्रचार-प्रसार करणे हे या दिवसामागचे महत्त्वाचे उद्दीष्ट आहे.

जगात हिंदीला चालना देण्यासाठी आणि हिंदी भाषेसंदर्भात जागरूकता निर्माण करण्यासाठी व हिंदीला आंतरराष्ट्रीय भाषा म्हणून ओळख निर्माण करू देण्यासाठी दरवर्षी १० जानेवारी या दिवशी जागतिक हिंदी दिवस साजरा केला जातो. परदेशातील भारतीय राजदूत हा दिवस विशेषरित्या साजरा करतात. या दिवशी सर्व सरकारी कार्यालयांमध्ये विविध विषयांवर हिंदीमधील व्याख्याने आयोजित केली जातात. जगात हिंदीचा विकास व प्रसार व्हावा म्हणून जागतिक हिंदी परिषदेची सुरुवात झाली. नागपूर येथे १० जानेवारी १९७५ रोजी प्रथम जागतिक हिंदी




परिषद झाली, म्हणून हा दिवस जागतिक हिंदी दिन म्हणून साजरा केला जातो.

हिंदी दिन आणि जागतिक हिंदी दिन यांच्यात फरक आहे. देशात १४ सप्टेंबर रोजी 'हिंदी दिन' साजरा केला जातो. त्याचबरोबर १० जानेवारी रोजी 'जागतिक हिंदी दिन' साजरा केला जातो.

जगभरात हिंदी चा प्रचार-प्रसार करण्यासाठी नागपुरात पहिली जागतिक हिंदी परिषद आयोजित करण्यात आली होती. म्हणून हा दिवस जागतिक हिंदी दिन म्हणून साजरा केला जातो. या परिषदेत ३० देशांतील १२२ प्रतिनिधी उपस्थित होते. २००६ सालापासून दरवर्षी १० जानेवारी रोजी जागतिक हिंदी दिन साजरा केला जातो.

स्वातंत्र्यानंतर विविधतेने भरलेल्या देशाला एकत्र आणण्यासाठी एक भाषा निवडणे अवघड होते. देशात अनेक भाषा आणि बोली होत्या, त्यामुळे अनेक विचारांनंतर नवीन राष्ट्राच्या भाषा म्हणून हिंदी आणि इंग्रजीची निवड करण्यात आली. या दिवशी विविध कार्यक्रम आयोजित केले जातात.

(साभार : इंटरनेट)




# मोबाईलमध्ये इंटरनेट झालंय स्लो? या टिप्स फॉलो करा

तुमचा मोबाईल स्लो होतो किंवा कधी हँग होतो. ही सर्व मोबाईल फोनची सामान्य समस्या आहे. नवा



मोबाईल फोनवर घेतल्यावर सुरुवातीला हा फोन नीट चालत असतो नंतर काही काळानंतर या फोनचा इंटरनेटदेखील स्लो होतो. जर तुमचा ही मोबाईल स्लो चालत असेल तर मोबाईलचा स्पीड कसा वाढवायचा ते जाणून घ्या...

स्मार्टफोन आणि इंटरनेट यांच्यात एक विशेष कनेक्शन आहे. तुमच्या फोनमध्ये असे अनेक ॲप्स असतील, जे इंटरनेटशिवाय काम करू शकत नाहीत. फोनमध्ये कमी इंटरनेट स्पीडची अनेक कारणे असू शकतात, ज्यामध्ये नेटवर्क सेटिंग्ज, बॅकग्राउंड ॲप्स आणि कॅशेसह अनेक सेटिंग्जचा समावेश आहे.

**नेटवर्क सेटिंग :** सर्व प्रथम तुमच्या फोनमध्ये योग्य नेटवर्क ऑपरेटरचे सिम कार्ड खात्री करा. तुमचा फोन ४G ला सपोर्ट करत असल्यास, तुम्ही ४G नेटवर्कवर आहात हे तपासा.

**डेटा ऑटो-अपडेट :** तुमच्या फोनमध्ये ऑटो डेटा-अपडेट चालू असल्यास, तुमच्या इंटरनेट स्पीडवर परिणाम होऊ शकतो. तुमच्या फोनच्या सेटिंग्जवर जा आणि डेटा ऑटो-अपडेट बंद करा.

**बिना कामाचे ॲप्स :** जर तुमच्या फोनमध्ये अनेक बॅकग्राउंड ॲप्स चालू असतील, तर तुमचा इंटरनेट स्पीड कमी होऊ शकतो. तुमच्या फोनच्या सेटिंगमध्ये जा आणि बॅकग्राउंड अप्स बंद करा.

**कॅशे आणि डेटा :** तुमच्या फोनवरील कॅशे आणि डेटा साफ केल्याने तुमचा इंटरनेट स्पीडदेखील सुधारू शकतो. तुमच्या फोनच्या सेटिंग्जवर जा आणि कॅशे आणि डेटा साफ करा.

**फोन रिस्टार्ट करा :** जर तुम्ही या सर्व सेटिंग्ज तपासल्या असतील तरीही तुमच्या इंटरनेटचा स्पीड वाढला नसेल तर तर तुम्ही फोन रिस्टार्ट करून पाहू शकता.

WI-FI **सेटिंग्ज :** तुमचा वाय-फायद वापरत असाल, तर तुमचा वाय-फाय पासवर्ड तुमच्यासोबत असेल आणि तुमचा वाय-फाय राउटर चालू माझा खात्री करा. तुम्ही तुमच्या वाय-फाय राउटरवर जाऊन ते रिबूट करण्याचा प्रयत्न देखील करू शकता.

**अनावश्यक ॲप्स बंद करा :** तुमचा फोनवर चालणारे अनावश्यक ॲप्स बंद केल्यात तर तुमचा इंटरनेट स्पीड सुधारू शकतो.

# इतिहास संशोधक डॉ. गणेश हरी खरे

महाराष्ट्रातील एक प्रसिद्ध इतिहास-संशोधक डॉ. गणेश हरी खरे यांचा जन्म पनवेल येथे १० जानेवारी १९०१ रोजी झाला. शालेय शिक्षण पनवेल, बेळगाव येथे झाले. माध्यमिक शिक्षण द्रविड हायस्कूल, वाई येथे झाले. १९२० साली मॅट्रिक झाल्यावर त्यांनी सांगली येथील विलिंग्डन महाविद्यालयात प्रवेश घेतला (१९२०); तथापि महाविद्यालयीन शिक्षण अर्धवट सोडून असहकाराच्या चळवळीत त्यांनी भाग घेतला.

असहकारितेच्या तत्त्वाप्रमाणे जामीन द्यायचे नाकारल्याने त्यांना १२ ऑगस्ट १९२२पासून एक वर्ष बंदीवासाची शिक्षा देण्यात आली. बंदीवासातून सुटका झाल्यावर (१९२३) खरे ह्यांनी सातारा जिल्ह्या काँग्रेसचे एक चिटणीस म्हणून वर्षभर काम केले. १९२४ च्या उत्तरार्धापासून १९२९ च्या प्रारंभापर्यंत साताऱ्याच्या राष्ट्रीय शाळेत शिक्षक म्हणून त्यांनी नोकरी केली. बा. ज. शिंदे यांच्या समवेत मद्यपाननिरोधन, कोर्ट बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण यांसारख्या चळवळींचा जावळी तालुक्यात त्यांनी प्रचार केला; तसेच कोयना धरण योजनेविरुद्ध लोकजागृती केली.



## निमित्त

पुढे १९२९मध्ये इतिहासाच्या अभ्यास-संशोधनासाठी ते पुण्यास भारत इतिहास संशोधक मंडळात गेले व तेथेच स्थायिक झाले. निवृत्तीपूर्वी मंडळाचे ते चिटणीस व अभिरक्षक होते (१९७३). १९७४ मध्ये त्यांची भारत इतिहास संशोधक मंडळाचे कार्याध्यक्ष म्हणून निवड झाली. पुणे विद्यापीठाने त्यांची डॉक्टरेटसाठी मार्गदर्शक व परीक्षक म्हणून नियुक्ती केली.

इतिहासाचा सर्वांगीण अभ्यास आणि संशोधन करता यावे, म्हणून त्यांनी हिंदी, उर्दू, फार्सी, कन्नड, संस्कृत, इंग्रजी वगैरे भाषांचा सखोल अभ्यास केला; तसेच इतिहासाशी संबंधित अशा नाणकशास्त्र, पुरातत्त्वविद्या, मूर्तिविज्ञान, पुरालेखविद्या यांचा अभ्यास केला. सर्व भारतभर प्रवास करून त्यांनी शेकडो ऐतिहासिक स्थळे तर पाहिलीच; पण नाणी, कागदपत्रे, पोथ्या व इतर ऐतिहासिक वस्तू जमा केल्या. सु. तीस इतिहासप्रसिद्ध घराण्यांचे कागद, २०,००० पोथ्या, ५,००० नाणी, ८० चित्रे, ३० ताम्रशासने व २०० इतर वस्तू एवढे प्रचंड साहित्य त्यांनी जमा केले. या सर्वांचा उपयोग सामान्य विद्यार्थ्याला तसेच चिकित्सक संशोधकाला व्हावा, म्हणून त्यांवर त्यांनी सु. ४०० लेख आणि पन्नासहून अधिक लहान-मोठी पुस्तके लिहिली. दक्षिणेच्या मध्ययुगीन इतिहासाची साधने, (३ खंड - १९३०, ३४, ४९), मूर्तिविज्ञान (१९३९), संशोधकांचा मित्र (१९५१), महाराष्ट्राची चार दैवते (१९५८) ही त्यांची मान्यवर व प्रसिद्ध पुस्तके उल्लेखनीय आहेत.

अखिल भारतीय नाणक-परिषदेचे अध्यक्षपद त्यांना देण्यात आले (१९७४). तसेच त्यांचा एक गौरवग्रंथही प्रसिद्ध झाला आहे (१९७५). पुणे विद्यापीठाकडून सन्माननीय डी. लिट्. पदवी देऊन त्यांचा गौरव करण्यात आला (१९८४). महाराष्ट्रात इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांनी निष्ठावंत इतिहाससंशोधकांची जी परंपरा निर्माण केली, त्याच परंपरेत खरे मोडतात. इतिहास संशोधनाला जीवन सर्वस्व वाहणारे खरे यांचे कार्य मौलिक आहे. पुणे येथे त्यांचे ५ जून १९८५ रोजी निधन झाले. (साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# जाणून घ्या, लहान मुलं तोंडात बोट का घालतात?

लहान मुले अनेकदा झोपेत असतानाही तोंडात बोटे घालू लागतात. जर तुमचे मूलंही दूध प्यायल्यानंतर तोंडात बोट घालून चोखत असेल तर त्याला झोप आलेली असू शकते.

तुमच्या घरी किंवा आजुबाजूला लहान मुले असतील तर त्यांना तोंडात बोटे घालताना तुम्ही हमखास पाहिले असेल. जेव्हा लहान मुले तोंडात बोटे किंवा अंगठा चोखत असतात आणि तुम्ही त्यांचा अंगठा काढलात तर ते तुमच्याकडे रागाने पाहतील किंवा मग जोरजोरात रडू लागतात.



मुलांसाठी बोटे चोखणे खूप सामान्य असून मुल मोठे झाल्यावर बोटे चोखण्याची सवय आपोआप सोडून देतील असे पालकांनाही वाटते. पण तुम्ही कधी विचार केला आहे का की लहान मुलं पुन्हा पुन्हा तोंडात बोटं का घालत राहतात?

**दात येणे :** लहान मुले दात येत असताना तोंडात बोटे घालतात.लहान मुलांचे दात बाहेर येतात तेव्हा ते हिरड्या खाजतात. अशावेळी तोंडात बोट घातल्याने त्यांना आराम वाटतो. यामुळेच ५ ते ६ महिन्यांची मुले तोंडात बोटे घालताना तुम्ही पाहिले असेल.

**झोप आल्यावर :** लहान मुले अनेकदा झोपेत असतानाही तोंडात बोटे घालू लागतात. जर तुमचे मूलंही दूध प्यायल्यानंतर तोंडात बोट घालून चोखत असेल तर त्याला झोप आलेली असू शकते.

**भूक लागल्यावर :** २ महिने ते १ वर्ष वयोगटातील मुले भूक लागल्यावर तोंडात बोटे घालतात. जर तुमचे मूलं १ ते २ तास खेळल्यानंतर वारंवार तोंडात बोट घालत असेल तर बाळाला भूक लागलेली असू शकेल. अशावेळी बाळाला लगेच दूध पाजण्याचा प्रयत्न करा.

**घाबरलेल्या स्थितीत :** अनेक वेळा मुलांना वातावरणात बदल झाल्यावर, अनोळखी व्यक्ती भेटल्यावर किंवा रस्त्याने चालताना तोंडात बोटे घालण्याची सवय असते. मुलं मनातू घाबरलेली असताना असं करु शकतात. या परिस्थितीत मुलाला शांत करण्याचा प्रयत्न करा. त्याच्या सभोवतालच्या गोष्टी बदलण्याचा प्रयत्न करा. त्याच्या सभोवताली हलके संगीत वाजवा, जेणेकरून त्याला चांगले वाटेल.

**आनंद व्यक्त करण्यासाठी :** लहान मुलांना बोलता येत नाही म्हणून ते तोंडात बोटे घालून आपला आनंद व्यक्त करतात. जर तुमचे मूल एखाद्याला पाहून हसत असेल आणि नंतर तोंडात बोट घालत असेल तर समजून घ्या की हा त्याचा आनंद व्यक्त करण्याचा एक मार्ग आहे.

# कचरा टाकण्यासाठी आंबेपूरला पर्यायी जागा द्या -भाजप नेते सुभाष पाटील

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील आंबेपूर ग्रामपंचायतीला वनविभागाने कांदळवन क्षेत्रात कचरा टाकण्यास हरकत घेतली आहे. कांदळवन क्षेत्रात कचरा टाकण्यास मनाई केली आहे. मात्र आधी पर्यायी जागा द्या आणि मग कारवाई करा, अशी मागणी भाजप नेते, माजी आमदार सुभाष पाटील यांनी जिल्हा प्रशासनाकडे केली. जिल्हाधिकारी यांना या प्रकरणात हस्तक्षेप करण्याची विनंती त्यांनी केली.



अलिबाग नगरपालिकेसह तालुक्यातील अनेक ग्रामपंचायतींचा कचरा डम्पिंग ग्राउंड नसल्याने कांदळवन लगत असलेल्या क्षेत्रात टाकला जातो. या जागा पूर्वीपासून महसूल विभागाच्या अखत्यारीत होत्या. या ठिकाणी कांदळवनेही नव्हती. पण खारभूमी विभागाच्या दुर्लक्षामुळे आज तालुक्यातील हजारो हेक्टर जमिनी कांदळवने तयार झाली आहेत. आणि या जमिनी आता संरक्षित वन म्हणून घोषित झाल्या आहेत. त्यामुळे आधी डंपिंग ग्रांऊडसाठी पर्यायी जागा द्या अशी मागणी माजी आमदार पाटील यांनी केली.

रायगड जिल्ह्यात जवळपास ११ हजार हेक्टर क्षेत्र महसूल विभागाने कांदळवन विभागाकडे वर्ग केले आहे. त्यामुळे कांदळवन विभागाने या परिसरात कचरा टाकण्यास हरकत घेतली आहे . वनविभागाच्या या आक्रमक भूमिकेमुळे स्थानिक ग्रामपंचायतींची तसेच नगरपालिकेची मोठी अडचण झाली आहे. जमा होणारा कचरा टाकायचा कुठे हा प्रश्न त्यांना भेडसावत आहे. या प्रश्नाकडे गांभीर्याने बघीतले जायला हवे असे मतही त्यांनी यावेळी व्यक्त केले. यासंदर्भात गुरुवारी सकाळी जिल्हाधिकाऱ्यांची त्यांनी भेट घेतली. आणि या प्रश्नाकडे तातडीने लक्ष्य देण्याची विनंती केली. यावर जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी ग्रामपंचायतला लवकरच पर्यायी जागा देण्याची हमी यावेळी दिली.

# श्रीवर्धन येथे गोवंश मांसाची वाहतूक करणाऱ्याच्या मुसक्या आवळल्या

**श्रीवर्धन : बातमीदार**

संपूर्ण महाराष्ट्र राज्यात गोवंश हत्येवरती कायदेशीर बंदी असताना सुद्धा अनेक व्यक्तींकडून अशा प्रकारची कृती करण्याचे प्रकार नेहमीच घडत असतात. रायगड जिल्ह्यातील माणगाव तालुका, म्हसळा तालुका व महाड तालुका या ठिकाणी गोवंश हत्येचे प्रमाण सर्वाधिक असल्याचे नेहमीच पाहायला मिळते. श्रीवर्धन शहराला लागूनच असलेल्या आराठी ग्रामपंचायत हद्दीतील मेटकर्णी परिसरात राहणारे काही इसम गोमास बाहेरून आणून विकत असल्याबाबत अनेक दिवसांपासून पोलिसांना गुप्त माहिती होती.

पोलिसांनी सदर व्यक्ती वरती नजर ठेवली असताना, काल दुपारी पावणे चार वाजण्याच्या सुमारास शौकत गुलाम काझी हा इसम स्कुटी वरून अंदाजे ३० किलो वजनाचे गोवंशमांस घेऊन येताना आढळून आला. त्याची गाडी भट्टीचा माळ परिसरात पोलिसांनी अडविली असता, त्याच्याजवळ गोवंशमांस असल्याचे आढळून आले. श्रीवर्धन पोलीस ठाणे येथे कर्तव्यावर असणारे पोलीस शिपाई तुषार रामभाऊ आठरे यांनी सदर इसमाला गाडी अडवून हटकले असता, त्याच्याजवळ साधारण ३० किलो वजनाचे गोवंश मांस असल्याचे निदर्शनास आले.



पोलिसांनी व्यक्ती व वाहतूक वाहतूक करत असलेली टीव्हीएस कंपनीची स्कुटी ताब्यात घेतली आहे.

# वासांबे ग्रामपंचायतीकडून ग्रामविकासाचा नवा अध्याय

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांच्या संकल्पनेतून व मार्गदर्शनाखाली राबविण्यात येणाऱ्या मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियान अंतर्गत जिल्हाभरात एकाच दिवशी वनराई बंधारे बांधणे मोहिमेचे आयोजन करण्यात आले.

पाणी अडवा पाणी जिरवा या जलसंधारण धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करत वासांबे -मोहोपाडा ग्रामपंचायतीच्या मार्फत श्रमदानाच्या माध्यमातून नैसर्गिक पाण्याच्या प्रवाहावर वनराई बंधारे उभारले आहेत. यामुळे पावसाळ्यात वाहून जाणारे पाणी अडवून ते जमिनीत मुरवले जाणार असून त्याचा थेट परिणाम भुजल पातळी वाढ, विहीरी, बोअरवेलच्या पाणी साठ्यात वाढ तसेच शेतीच्या उत्पादन क्षमतेत वाढ होणार आहे.

श्रमदान, लोकसहभाग आणि शासकीय योजनेचा समन्वय साधून सरपंच उमा मुंढे, उपसरपंच दीपक कांबळे, ग्रामपंचायत अधिकारी वैभव पाटील, सदस्यांनी उपक्रम पूर्ण केला.



# कर्जत तालुक्यात एकाच दिवशी तब्बल ६२ वनराई बंधारे साकारले



**कर्जत : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या संकल्पनेतून कर्जत तालुक्यातील सर्व ग्रामपंचायत हद्दीत जलसंधारणासाठी मोठ्या प्रमाणावर वनराई बंधारे उभारण्याचे काम हाती घेण्यात आले. पंचायत समिती कर्जतच्या माध्यमातून तालुक्यातील नाले, ओढे व लहान नद्यांमधील पाणी अडवण्यासाठी एकाच दिवशी तब्बल ६२ वनराई बंधारे श्रमदानातून बांधण्यात आले.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत तालुक्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये अभियान राबविण्यात आले. ग्रामपंचायत हद्दीतील जंगल व दुर्गम भागांमध्ये असलेल्या नाले व ओढ्यांवर श्रमदानातून वनराई बंधारे उभारण्याची योजना यामध्ये समाविष्ट आहे. या उपक्रमात पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सुशांत पाटील यांनी स्वतः पुढाकार घेत विविध ठिकाणी भेटी देत श्रमदानात सहभाग नोंदवला.

माथेरानच्या डोंगरकुशीत वसलेल्या बेकरे ठाकूरवाडी या अतिदुर्गम आदिवासी वाडीमध्ये आज विशेष उपक्रम राबविण्यात आला. या वाडीपर्यंत पक्क्या रस्त्याची सोय नसून कच्च्या रस्त्यानेच जावे लागते. अशा भागातही वन्य प्राणी व स्थानिक नागरिकांसाठी पाण्याची सोय व्हावी. या उद्देशाने जंगलात जाऊन वनराई बंधारे बांधण्यात आले. या ठिकाणी गटविकास अधिकारी सुशांत पाटील यांच्यासह पंचायत समितीचे अधिकारी व कर्मचारी यांनी प्रत्यक्ष श्रमदान केले.

ग्रुप ग्रामपंचायत माणगाव (वरेडी) अंतर्गत मौजे बेकरे ठाकूरवाडी येथे हा उपक्रम यशस्वीपणे पार पडला. यावेळी ग्रामपंचायत अधिकारी शरदचंद्र पवार, ग्रामपंचायत कर्मचारी भरत मुकणे, यांनी श्रमदान केले.

# शाळकरी मुलांचा पायी प्रवास धोकादायक, अपघाताची भीती



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

सावरोली-खारपाडा या मार्गावर रस्त्यालगत प्राथमिक तसेच माध्यमिक शाळा असून काही शाळेचे अंतर एक ते दोन किमी असल्यामुळे शाळकरी मुले पायी चालत जाणे पसंद करीत असतात, मात्र मागील काही महिन्यापूर्वी या रस्त्यावर अपघाताचे प्रमाण वाढत असल्यामुळे पालकांच्या मनात आपल्या पाल्यांविषयी भीती निर्माण होत असून, मुलगा शाळेत पोहचेपर्यंत ते घरी येईपर्यंत पालक भीतीच्या छायेखाली असल्याचे मत पालकवर्गाचे आहे.

सदर या मार्गावरून पाताळगंगा हद्दीतील ग्रुप ग्रामपंचायत माजगाव हद्दीत राजिप शाळा माजगाव व कोएसो माध्यमिक शाळा असुन या परिसरातील मुले शिक्षण घेण्यासाठी या शाळेमध्ये पायी जात असतात. परिणामी या रस्त्यावर अवजड वहाने मोठ्या प्रमाणात रेलचेल असल्यामुळे अपघाताची समस्या गंभीर होत आहे. त्याचबरोबर या ठिकाणी वळणाचे रस्ते धोकादायक ठरत आहे. अशा ठिकाणी गतीरोधक बसवण्याची मागणी केली आहे

# ओंकार मोहिरे यांचे उपोषण तिसऱ्या दिवशी स्थगित; प्रशासनाकडून त्रिसदस्यीय चौकशी

## पोलादपूर तालुक्याचा १४ वर्षांचा वनवास संपण्याची आशा

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पंचायत समितीच्या शिक्षण विभागाच्या गैरकारभाराविरुद्ध महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे तालुका अध्यक्ष ओंकार मोहिरे यांचे ६ जानेवारीपासून सुरू असलेल्या उपोषणाची यशस्वी सांगता झाली आहे. रायगड जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाचे कक्ष अधिकारी संजय कवितके यांच्या हस्ते उपोषण स्थगित करण्याचे लेखी पत्र आणि लिंबू सरबत स्वीकारून ओंकार मोहिरे यांनी पोलादपूर पंचायत समितीच्या शिक्षण विभागाचे गटशिक्षणाधिकारी सुभाष साळुंखे यांच्या मनमानी कारभाराचा उपोषणाच्या सत्याग्रही मार्गाने शेवट केला आहे

महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे पोलादपूर तालुका अध्यक्ष ओंकार मोहिरे यांनी मनसे तालुका अध्यक्ष दर्पण दरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली प्राथमिक शिक्षण विभागाच्या विविध अन्यायकारक व मनमानी धोरणाबद्दल पत्रव्यवहार व पाठपुरावा करून



पोलादपूर तालुक्यातील प्राथमिक शिक्षणाला सुनियोजितपणा आणण्यासाठी गेल्या काही वर्षापासून प्रयत्न चालवला आहे. यामध्ये ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे हित तसेच शैक्षणिक धोरणामध्ये गटशिक्षणाधिकारी सुभाष साळुंखे यांच्या मनमानी कारभाराच्या तक्रारी याबद्दल पाठपुरावा करण्यात आला आहे.

शिक्षण उपसंचालकांपर्यंत झालेल्या या पाठपुराव्यातून प्राप्त आदेशांवर जिल्हा परिषदेचा शिक्षण विभाग आणि पंचायत समिती योग्य अंमलबजावणी होत नसल्याने ६ जानेवारी २०२६ रोजी मनविसेतालुका अध्यक्ष ओंकार मोरे हे उपोषणाला बसले. या उपोषणाबाबत दोन दिवस चालढकल करणाऱ्या रायगड जिल्हा परिषद शिक्षण विभागाच्या प्रशासनाला तिसऱ्या दिवशी गांभिर्याने लक्ष पुरवावे लागले. रायगड जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिकारी कार्यालयाकडून कक्ष अधिकारी संजय कवितके आणि पोलादपूरच्या गटविकास अधिकारी दीप्ती गाट यांनी उपोषणकर्ते ओंकार मोहिरे आणि जिल्हा परिषद शिक्षणाधिकारी यांच्यासोबत सविस्तर चर्चा केली.

तिसऱ्या दिवशी पोलादपूर पंचायत समितीचा शिक्षण विभाग आणि गटशिक्षणाधिकारी सुभाष साळुंखे यांच्या विरुद्ध त्रिसदस्य चौकशी समितीमार्फत चौकशी करून दोष सिद्ध झाल्यास योग्य ती कार्यवाही करण्याची लेखी ग्वाही शिक्षणाधिकारी ललिता दहीतुले-कावडे यांच्या सहीने देण्यात आली.

# सुधागडमधील तरुण, आदिवासी बांधव रोजगारासाठी करताहेत स्थलांतर

**सुधागड : प्रतिनिधी**

सुधागड तालुका हा आदिवासीबहुल असून गेल्या काही वर्षांत येथे अनेक औद्योगिक कंपन्या उभ्या राहत आहेत. ही विकासाची जमेची बाजू असली तरी तालुक्यातील तरुण बेरोजगारीच्या गर्तेत अडकले आहेत. विशेषतः आदिवासी समाजातील तरुणांना रोजगाराच्या शोधात तालुक्याबाहेर, अगदी कर्नाटकातील कोळसा खाणींपर्यंत स्थलांतर करावे लागत आहे. ही बाब केवळ आर्थिक नव्हे, तर सामाजिकदृष्ट्याही गंभीर आहे.

स्थानिक शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी विकून उद्योगांना जागा उपलब्ध करून दिली. परिणामी अनेक ग्रामपंचायतींमध्ये कंपन्यांचे काम सुरू झाले आहे, मात्र या कंपन्यांमध्ये आपल्या तालुक्यातील तरुणांना रोजगार मिळतोय का, यावर अजूनही प्रश्नचिन्ह आहे. रोजगाराच्या अभावामुळे स्थलांतरित होणाऱ्या कुटुंबांची मुले शिक्षणापासून वंचित राहत आहेत, ही बाब अधिक वेदनादायक आहे.

निवडणुकीच्या काळात अनेक लोकप्रतिनिधी रोजगार देण्याची, स्थलांतर थांबवण्याची आश्वासने देतात, मात्र निवडणूक संपताच ही आश्वासने हवेत विरतात. प्रत्यक्षात स्थानिक तरुणांना कंपन्यांमध्ये नोकरी मिळवून देण्यासाठी ठोस प्रयत्न होताना दिसत नाहीत. केवळ घोषणांवर नव्हे, तर कृतीवर विश्वास ठेवणारा मतदार आता जागरूक झाला आहे.




**महावितरण** | **ई-निविदा सूचना**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत**

स्थापत्य विभाग, महावितरण, भांडुप कार्यालय अंतर्गत असणा-या विविध प्रकारच्या स्थापत्य कामांकरिता टी-९५, टी-९६, टी-९७, टी-९८, टी-९९ आणि टी-१०० (२०२५-२६) अशा एकुण **सहा** निवीदा महावितरण कंपनीच्या www.mahadiscom.in या e-Tender च्या संकेतस्थाळावर उपलब्ध करण्यात आल्या आहेत. सदर निवीदा विक्रीसाठी **दि. १०.०१.२०२६ पासून ते दि. १८.०१.२०२६** पर्यंत उपलब्ध राहतील व निवीदा भरण्याची अंतिम तारीख **दि. १९.०१.२०२६** ला **दुपारी १.००** वाजेपर्यंत आहे. निवीदेच्या आवृत्तीत/ तारखा / इ. कोणताही बदल झाल्यास, शुध्दीपत्र यापुढे आमच्या वेबसाईटवर प्रकाशित केले जाईल.

**(सही)**

**कार्यकारी अभियंता (स्था.) , स्थापत्य विभाग भांडुप**


# गणित संबोध परीक्षेचे पारितोषिक वितरण

**मुरुड : प्रतिनिधी**

रायगड गणित विज्ञान अध्यापक मंडळाच्या गणित संबोध परीक्षा २०२४-२५ चा पारितोषिक वितरण समारंभ गुरुवारी सर एस ए हायस्कूल, मुरुड येथे उत्साहात पार पडला.

या समारंभाला मुरुड तालुक्यातील विविध शाळांचे मार्गदर्शक शिक्षक,पालक व दीडशेहून अधिक विद्यार्थी उपस्थित होते. रायगड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी ललिता दहितुले

मुरुड तालुका पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी म सुनिल गवळी , रा. जि. प.अलिबाग शिक्षण विभागातील श्री. शेडगे , सर एस ए हायस्कूलचे मुख्याध्यापक सरोज राणे, छत्रपती शिवाजी नूतन विद्यालय यशवंतनगरच्या मुख्याध्यापिका अर्चना



खोत,श्री. कवळे , श्री पाटील ,प्रविण भगत ,गणित संबोध परीक्षा अध्यक्षा मीना मोरे गणित मंडळ तालुका अध्यक्ष संदेश चोरघे,विज्ञान मंडळ तालुका अध्यक्ष सुरेश मोरे आदी उपस्थित होते.यावेळी मुख्याध्यापक सरोज राणे, संदेश चोरघे, परीक्षा प्रमुख मोरे मॅडम आणि सुरेश मोरे आदींनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले.

शिक्षणाधिकारी ललिता दहितूले यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करतांना यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आणि गणित शिक्षणाच्या महत्त्वावर प्रकाश टाकला. परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांना आणि शाळांना या वेळी सन्मानित करण्यात आले. सदर परीक्षेला मुरुड तालुक्यातून ५०७ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी २७६ विद्यार्थ्यांना यशस्वी प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.त्यातील जिल्हा शिष्यवृत्ती प्राप्त एकूण८ विद्यार्थी उत्तेजनार्थ एकूण ८ विद्यार्थ्यांचा खास गौरव करण्यात आला. समारंभात डायनॅमिक स्कूल अँड टीचर अवॉर्ड मुरुड शहरातील सर.एस.ए.हायस्कूल यांना देण्यात आला.तर उपक्रमशील शाळा बक्षीस विजेती शाळा म्हणून छत्रपती शिवाजी नूतन विद्यालय यशवंतनगर नांदगाव यांना देण्यात आला आहे. मुरुड तालुक्यातून सर्वात जास्त शालेय विद्यार्थी नांदगाव हायस्कूलचे १७९ विद्यार्थी या परीक्षेसाठी बसले होते. गणित संबोध परीक्षेस सर. एस ए हायस्कूल,नांदगाव हायस्कूल,सुविद्या स्कूल,नज,नचिकेत इंग्रजी माध्यम,माऊंट कर्मेल,पी. एन पी.मिठागर,पी. एन.पी. काकलघर, वळके यांनी सहभाग घेतला होता

# कर्जत तालुका प्राथमिक शिक्षक संघाचा वर्धापन दिन साजरा

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील शिक्षकांनी अखिल भारतीय प्राथमिक शिक्षक संघाचा वर्धापन दिन साजरा केला. या वर्धापन दिन सोहळ्यात संघटनेची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. कर्जत शहरातील जीवन शिक्षण मंदिर शाळेत शिक्षण परिषदेच्या वर्धापन दिन सोहळ्याचे आयोजन केले होते.

अखिल भारतीय शिक्षण परिषदेचे संस्थापक दादासाहेब दोंदे यांच्या प्रतिमेला पदोन्नती मुख्याध्यापक संघटनेचे कोकण संघटक भास्कर थोरवे यांनी पुष्पहार अर्पण करून केला. यावेळी जिल्हा संघटक संतोष दातीर, जिल्हा कार्याध्यक्ष विजय जगताप, जिल्हा उपाध्यक्ष मोहन पाटील, सचिव दत्तात्रेय चौधरी तसेच कार्याध्यक्ष मुरलीधर गावित कोषाध्यक्ष विठ्ठल बडे, सहकोषाध्यक्ष वाड्या गावित, वेच्या गावित, आकाराम पाटील, आदी उपस्थित होते.

सुरुवातीला तालुका मनोहर भोसले यांनी प्रास्ताविक करताना 'शिक्षक संघाचे राष्ट्रीय स्तरावरील कार्याचा उजाळा दिला.



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की मौजे चिखले- तहसील, पनवेल, जिल्हा- रायगड, येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार मोहम्मद मेहबुब शेख, यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणे:

**शेतजमीनीचे वर्णन**

**मौजे चिखले, तहसील पनवेल जिल्हा रायगड येथील**
**मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील**

| गट क्रमांक व उपविभाग | भोगवटादार वर्ग | क्षेत्र लावणी लायक हे.आर.प्रती | क्षेत्र पोटखराबा हे.आर.प्रती | क्षेत्र एकुण क्षेत्र हे.आर.प्रती | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|---|
| १०३/६ | १ | ०-१७-७० | ०-००-०० | ०-१७-७० पैकी ०-०५-९० | १.२३ |

वरील शेतजमीन / मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्यासहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन २१ दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ०९/०१/२०२६

**सही/-**
**अॅड. स्वप्निल व्यं. जाधव**
बी.ए., एल. एल. बी.
( खरेदीदाराचे वकील)

**कार्यालयीन पत्ता** - शॉप नं. १५४, पनवेल महानगरपालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स, दत्त झेरॉक्सच्यावर, ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६.
मोबाईल : ८८८८२७१७५९

# मनसेच्या पदाधिकाऱ्यांचा भाजपत प्रवेश

## आमदार मंदा म्हात्रेंच्या प्रचार सभेत हाती घेतले 'कमळ'

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६च्या अनुषंगाने बेलापूर विधानसभा क्षेत्रातील प्रभाग क्रमांक २७मध्ये भारतीय जनता पार्टीचे अधिकृत उमेदवार तेजस्वी म्हात्रे, ज्योती पाटील, संतोष कोळी, प्रमोद जोशी यांच्या भव्य प्रचार सभेचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी प्रमुख वक्त्या म्हणून बेलापुर विधानसभा क्षेत्राच्या आमदार मंदाताई म्हात्रे उपस्थित होत्या, सदर प्रचार सभा ही मोठ्या उत्साहात व नागरिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात पार पडली. सदर प्रचार सभेमध्ये आमदार मंदाताई म्हात्रे यांनी नवी मुंबई शहरात व बेलापूर विधानसभा क्षेत्रात राबविण्यात आलेल्या विविध विकासकामांची सविस्तर माहिती उपस्थितांना दिली.



पायाभूत सुविधा, नागरी सोयी-सुविधा, महिला व युवकांसाठी राबविण्यात आलेल्या योजनांमुळे परिसराच्या सर्वांगीण विकासाला गती मिळाल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

त्याच बरोबर प्रचार सभेचे औचित्य साधून आमदार मंदा म्हात्रे यांच्या विकासाभिमुख कार्यशैलीने प्रभावित होऊन नवी मुंबईतील महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नवी मुंबईतील महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे विभाग अध्यक्ष - बेलापूर तथा महाराष्ट्र नवनिर्माण नविक सेना - उपाध्यक्ष (महाराष्ट्र राज्य) भुषण कोळी, उप विभाग अध्यक्षा महिला सेना दिपाली कोळी सहसचिव (नवी मुंबई) विद्यार्थी सेना मधुर रमेश कोळी, सहसचिव (नवी मुंबई ) विद्यार्थी सेना डॉ. विपुल पाटिल, शाखाध्यक्ष भालचंद्र कोळी, उपशाखाध्यक्ष रवींद्र डोंगरदिवे, उपविभाग अध्यक्ष मनविसे कुणाल कोळी, उपविभाग अध्यक्ष मनविसे भूपेन कोळी, उपविभाग अध्यक्ष विनोद लांडगे तसेच अनेक मनसे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पार्टीमध्ये जाहीर पक्षप्रवेश केला.

या पक्षप्रवेशामुळे बेलापूर विधानसभा क्षेत्रात भाजपची संघटनात्मक ताकद अधिक भक्कम झाल्याचे स्पष्ट झाले आहे. यावेळी शेकडो नागरिक सभेसाठी उपस्थित होते.

# रेझिंग डेनिमित्त वाहनचालकांना वाहतूक पोलिसांकडून मार्गदर्शन

**उरण : वार्ताहर**

पोलीस रेझिंग डे सप्ताह तसेच रस्ता सुरक्षा अभियान २०२६ निमित्त न्हावाशेवा वाहतूक शाखा चांदणी चौक येथे नवीमुंबई वाहतूक पोलिस उपायुक्त तिरुपती काकडे यांचे मार्गदर्शनाखाली रेझिंग डे साजरा करण्यात आला.

न्हावाशेवा वाहतूक शाखेच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक वैशाली गलांडे, अंमलदार प्रभाकर सुलेभाविकर, किरण म्हात्रे यांनी चांदणी चौक येथे वाहन चालक मालक तसेच मोटर सायकल चालक आणि त्या चौक मध्ये वावरणारे लोकांना एकत्रित करून सर्व वाहन चालकाना वाहतूक नियमा विषयी जनजागृती करून , रेझींग डे चे बोर्ड दाखवून, तसेच रस्ता सुरक्षा अभियान




अंतर्गत वाहन चालक यांना वाहतूक नियमाबाबत गाडी विरुद्ध दिशेने न चालविणे,दारू पिऊन गाडी न चालवणे,नेहमी लायसन्स जवळ बाळगणे,रिक्षा चालक नेहमी युनिफॉर्म परिधान करणे, गाडी चालवीतअसतांना मोबाईलवर संभाषण न करणे, मोटरसायकल चालवीत असतांना नेहमी हेल्मेट परिधान करणे.भाडे कधीही नाकारू नये, कधी ही सिग्नल जंप न करणे,अशाप्रकारे संदेश या कार्यक्रमाच्या अनुषंगाने देण्यात येऊन त्यांना योग्य ते मार्गदर्शन केले.

# पीरवाडी बीचवर कांदळ विभागाचे बीच क्लीन-अप स्वच्छता अभियान उत्साहात

## ■ २७० नागरिकांकडून किनाऱ्याची स्वच्छता

**उरण : प्रतिनिधी, बातमीदार, वार्ताहर**

दक्षिण कोकण कांदळवन विभागाच्या वतीने काल पीरवाडी बीचवरील समुद किनाऱ्याची स्वच्छता करण्यात आली. बीच क्लीन-अप स्वच्छता मोहीमेत महाविद्यालयातील विद्यार्थी, पर्यावरण संस्था, समिती, विविध विभागाचे शासकीय अधिकारी नागाव ग्रामपंचायत व आदी सुमारे २७० हुन अधिक नागरिक सहभागी झाले होते. या मोहीमेत सुमारे तीन टन कचरा जमा करून त्याची विल्हेवाट लावण्यात आली.

पिरवाडी बीच हा पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील आहे. परिसरात वाढते पर्यटन, प्लास्टिक कचरा व समुद्रातून किनाऱ्यावर वाहून येणारा कचरा यामुळे परिसरावर स्वच्छता व पर्यावरणाच्या दृष्टीने प्रतिकूल परिणाम होत आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये जनजागृती करण्याच्या दृष्टीकोनातून बुधवारी पिरवाडी बीचवरील समुद किनाऱ्याची स्वच्छता करण्यात आली.

दक्षिण कोकण कांदळवन विभागीय वनाधिकारी कांचन पवार यांच्या मार्गदर्शनाखाली व अलिबाग कांदळवन विभागाचे वनक्षेत्रपाल कुलदिप पाटकर यांच्या नेतृत्वाखाली ही मोहीम आयोजित करण्यात आली होती. या बीच क्लीन-अप स्वच्छता



मोहीमेत वीर वाजेकर फुंडे कॉलेजचे प्रमोद ठक्कर, प्राध्यापक, विद्यार्थी, नागाव कांदळवन सह व्यवस्थापन समितीचे सदस्य, फ्रेंड्स ऑफ नेचरचे निकेतन ठाकूर, नायब तहसीलदार प्रभाकर नवाळे, एनजीओ,कांदळवन प्रकल्प सहयोगी, मॅन्ग्रोज फाउंडेशनचे प्रतिनिधी,उरण कांदळवन परिमंडळ वन अधिकारी किशोर सोनावणे, विभागीय वन अधिकारी, कर्मचारी तसेच २७० हून अधिक विद्यार्थी, नागरिक, शासकीय अधिकारी, पत्रकार सहभागी झाले होते.

या बीच क्लीन-अप स्वच्छता मोहीमेत पीरवाडी दिड किमी परिसरातील समुद्र किनाऱ्यावरील प्लास्टिक बाटल्या, पॉलिथिन पिशव्या, अन्नपदार्थांचे रॅपर्स, काच तुकडे, थर्माकोल व इतर न कुजणारा कचरा समुद्र किनाऱ्या लगतच्या परिसरातून गोळा करण्यात आला. गोळा केलेला कचरा विल्हेवाटीसाठी पाठविण्यात आला.

या वेळी वनपरिक्षेत्र अधिकारी कुलदिप पाटकर यांनी आयोजित करण्यात आलेल्या या स्वच्छता अभियानाचे महत्त्व सांगितले.तसेच पिरवाडी बीचवरील प्लास्टिक व इतर न कुजणारा कचरा हटविणे, किनारी जैवविविधता व सागरी जीवसृष्टीचे संरक्षण करणे, स्वच्छ समुद्रकिनाऱ्याचे महत्त्व आणि पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती करणे, स्थानिक नागरिक व स्वयंसेवकांचा पर्यावरणीय उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग वाढविणे यासाठी जनजागृती करण्याच्या उद्देशानेच बीच क्लीन-अप स्वच्छता मोहीम राबविण्यात आली आहे.तसेच किनारी परिसंस्थेचे संवर्धन, कांदळवनचे महत्त्व तसेच समुद्रकिनारा स्वच्छ ठेवण्यासाठी सर्व नागरिकांची सामूहिक जबाबदारी, प्लास्टिक प्रदूषणाचे सागरी व किनारी जीवसृष्टीवर होणारे दुष्परिणाम,व पर्यावरण संरक्षणातील भूमिका याबाबतही पाटकर यांनी मार्गदर्शन केले.

# महात्मा फुले महाविद्यालयात सामाजिक शास्त्र विषयाची कार्यशाळा

**उरण : वार्ताहर**

रयत शिक्षण संस्थेच्या पनवेल येथील महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य (एमपीएएससी) महाविद्यालयात सोमवारी (दि.५) रायगड व पश्चिम विभागाची कर्मवीर भाऊराव पाटील प्रवेश परीक्षा अकॅडमी अंतर्गत सामाजिक शास्त्र विषयाची कार्यशाळा यशस्वीरीत्या झाली.

या कार्यशाळा रयत शिक्षण संस्थेचे माजी सचिव तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. रयत शिक्षण संस्थेच्या ऑडिट विभागाचे सहसचिव व ज्युनिअर कॉलेज गुणवत्ता विभागाचे प्रमुख डॉ. राजेंद्र मोरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यशाळेच्या प्रास्ताविकात प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर यांनी रयत शिक्षण संस्थेची वाटचाल, संस्थेची ध्येयधोरणे तसेच देशाच्या शैक्षणिक क्षेत्रात संस्थेचे दिशादर्शक योगदान याविषयी सविस्तर माहिती दिली.



या प्रकल्पाचे प्रमुख डॉ. राजेंद्र मोरे यांनी कर्मवीर भाऊराव पाटील प्रवेश परीक्षा अकॅडमी या उपक्रमाची माहिती देताना, या अकॅडमीमुळे कला विभागाची शैक्षणिक गुणवत्ता वाढण्यास तसेच विद्यार्थ्यांची पटसंख्या वाढीस निश्चितच मदत होईल, असा विश्वास व्यक्त केला. तसेच सदर कार्यशाळेचे उद्दिष्ट त्यांनी स्पष्ट केले.

कार्यशाळेचे तज्ञ मार्गदर्शक म्हणून अण्णासाहेब आवटे महाविद्यालयाचे प्रा. नामदेव भोर यांनी एम.पी.एस.सी., यू.पी.एस.सी., स्टाफ सिलेक्शन, हॉटेल मॅनेजमेंट व केटरिंग या विविध स्पर्धा परीक्षांबाबत प्रशिक्षणार्थींना सखोल मार्गदर्शन केले.

फुंडे येथील तुकाराम हरी वाजेकर ज्युनिअर कॉलेजचे प्रा. किशोर पाटील यांनी पोलीस भरती, लष्करी भरती, ग्रामसेवक, तलाठी, वनविभाग व डाक सेवा या सरळ सेवा भरती संदर्भात प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन करून उपयुक्त माहिती दिली.

कार्यशाळेच्या सांगता समारंभात रायगड विभागाचे विभागीय अधिकारी मोहन कोंगेरे यांनी हा उपक्रम कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये कसा प्रभावीपणे राबविता येईल, तसेच या उपक्रमामागील रयत शिक्षण संस्थेचे उद्दिष्ट स्पष्ट केले.

# जेएनपीएने हरित उपक्रम आणि बंदर विकासासाठी भागधारकांशी केली चर्चा

**उरण : वार्ताहर**

भारतातील सर्वात मोठे कंटेनर बंदर असलेल्या जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधीकरणाने (जेएनपीए) यांनी मंगळवार, ६ जानेवारी २०२५ रोजी भागधारकांची बैठक आयोजित केली. या बैठकीत हरित उपक्रमांवर तसेच बंदराच्या भावी वाटचाल व शाश्वततेशी संबंधित विविध धोरणात्मक विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

या बैठकीस कंटेनर टर्मिनल ऑपरेटर, कंटेनर शिपिंग लाईन्ससह प्रमुख भागधारक उपस्थित होते. बदलते जागतिक प्रवाह, बंदर क्षेत्रातील नव्या घडामोडी तसेच भविष्यातील गरजांसाठी कार्यात्मक सज्जतेबाबत विचारविनिमय करण्यात आला. बैठकीत सहभागी भागधारकांनी आपले दृष्टिकोन मांडत समन्वयातून शाश्वत व कार्यक्षम विकास साधण्यावर भर दिला.

संवादाच्या दरम्यान, जागतिक शिपिंग उद्योगात पर्यायी व स्वच्छ



इंधनांच्या विकसित होत असलेल्या परिदृश्यावर तसेच हरित इंधनावर चालणाऱ्या जहाजांची जेएनपीए येथे वाढती आवक कशी होऊ शकते, यावर सखोल चर्चा करण्यात आली. अशा जहाजांना सेवा देण्यासाठी आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधांची तयारी आणि दीर्घकालीन नियोजन याबाबत भागधारकांनी आपले दृष्टिकोन मांडले. यामध्ये एलएनजी, मेथेनॉल, ग्रीन हायड्रोजन, अमोनिया आदी विविध प्रकारच्या इंधनांचा अवलंब करण्याची व्यवहार्यता, त्यासाठी लागणारी पायाभूत रचना तसेच सुरक्षित व शाश्वत कार्यपद्धती यांवरही चर्चा करण्यात आली.

चर्चेदरम्यान बंदराने संपूर्णपणे हरित ऊर्जेवर आधारित कार्यप्रणालीकडे संक्रमण करण्याच्या दिशेने सुरू असलेल्या प्रयत्नांवर सविस्तर विचारविनिमय करण्यात आला. यासोबतच कार्यक्षमता, सुरक्षितता व उत्पादकता वाढवण्यासाठी धक्का (व्हार्फ), यार्ड, गेट तसेच रेल्वे ऑपरेशन्समध्ये व्यापक स्वयंचलन (ऑटोमेशन) यार्ड, गेट तसेच रेल्वे ऑपरेशन्समध्ये व्यापक स्वयंचलन. तसेच जहाजांना किनारी वीजपुरवठा (शोर पॉवर सप्लाई) उपलब्ध करून देण्याच्या प्रायोगिक प्रकल्पावर सखोल चर्चा करण्यात आली.

या बैठकीला जेएनपीएचे उपाध्यक्ष, रवीश कुमार सिंग आणि जेएनपीएचे विभाग प्रमुख उपस्थित होते. भविष्यातील वाहतूक वाढ आणि कार्यात्मक गरजा लक्षात घेऊन जहाज दुरुस्ती व देखभाल यांसारख्या अतिरिक्त बंदराधारित सुविधांची आवश्यकता यावरही बैठकीत चर्चा करण्यात आली. यासोबतच नौवहन आणि क्षमतावाढीशी संबंधित बाबी- जसे की ड्रेझिंगची गरज, बंदराच्या जमिनीची आवश्यकता असलेले संभाव्य प्रकल्प, तसेच अंतर्गत (हिंटरलँड) जोडणी व लॉजिस्टिक्स कार्यक्षमता सुधारण्यासाठी रस्ते आणि रेल्वे कनेक्टिव्हिटी मजबूत करण्याच्या उपाययोजनांवर सविस्तर विचारविनिमय करण्यात आला.

# वातावरणीय बदलाने मासळीचे प्रमाण घटले

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

वातावरणातील बदलाचा फटका स्थानिक मासळी बाजाराला बसला असून स्थानिक बाजारात मासळीचे दर मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. गारवा, थंडी, धुके आणि बदलते हवामान यामुळे समुद्रात मासेमारी कमी झाल्याने बाजारात मासळीची आवक घटली आहे. परिणामी, मागणीच्या तुलनेत पुरवठा कमी पडत असल्याने दर चढे झाले आहेत.

मच्छीमारांना प्रतिकूल हवामानामुळे समुद्रात जाणे कठीण होत असून मासे खोल पाण्यात स्थलांतरित होत असल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे बांगडा, पापलेट, सुरमई, कोळंबी, रावस यांसारख्या लोकप्रिय मासळींचे भाव सर्वसामान्यांच्या



आवाक्याबाहेर गेले आहेत.

स्थानिक बाजारात बांगड्याचा दर ३०० ते ४०० रुपये प्रतिकिलो, पापलेट ८०० रुपयांच्या पुढे, तर कोळंबीचे दरही मोठ्या प्रमाणात वाढल्याचे चित्र आहे. हवामान सुरळीत झाल्याशिवाय दर कमी होणार नाहीत, अशी प्रतिक्रिया मासेमारी करणाऱ्या बांधवान कडून व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, नववर्ष आणि सणासुदीच्या पार्श्वभूमीवर मागणी वाढलेली असतानाच वातावरण बदलामुळे निर्माण झालेल्या या परिस्थितीमुळे मासळीप्रेमींना महागाईचा फटका सहन करावा लागत आहे.

**सध्याचे दर**

| |
|---|
| पॉपलेट ८०० ते १४०० किलो |
| सुमई १२०० किलो |
| बोंबील २०० ला ६ नग (वाटा) |
| कोळंबी ६०० किलो |
| जिताडा १२०० किलो |
| रावस १५०० किलो |
| घोळ १३०० ते १६०० रु.किलो |

नवी मुंबईतील बहुतांश मच्छिमार हे मुंबई येथील भाऊचा धक्का व कुलाबा येथून ताजी मासळी खरेदी करतात. मात्र त्या मासळीची देखील आवक कमी झाल्याने त्यांना देखील भाव वाढीचा फटका बसला आहे.

एकीकडे गारठा वाढला तर दुसरीकडे वाढते प्रदूषण याचा सगळा फटका मासळीच्या अवके वर होतो. त्यामुळे कमी मासळी मिळत असल्याने त्यांचे दर ही वाढीव झाले आहेत. दिवाळे खाडीपासून ते ऐरोली खाडीपर्यंत मासेमारी केली जाते.

> **मांदेली आणि बोंबील हे सर्वसामान्य खवय्यांच्या पसंतीचे व परवडणारे मासे सुद्धा महाग झाले आहेत. त्यात वातावरणातील गारठ्यामुळे उष्णतेच्या शोधात मासे समुद्राच्या तळाला जाऊ लागले आहेत. परिणामी मासळीची आवक घटली असून दर वाढले आहेत. त्यामुळे सर्वसामान्य मच्छीमारही आर्थिक संकटात सापडले आहेत.**
> **-कविता मढवी,**
> मासे विक्रेती

# पनवेलमध्ये पोलीस पाटीलांची बैठक; पोलिसांकडून सूचनांसह मार्गदर्शन

**पनवेल : वार्ताहर**

महानगरपालिका निवडणूक व पोलीस वर्धापन दिन सप्ताहानिमित्त पनवेल तालुका पोलीस ठाणे हद्दीतील पोलीस पाटील यांची रेझिंग डे निमित्ताने बैठक आयोजित करण्यात आली होती .

या वेळी आयोजित बैठकीत मार्गदर्शन करताना वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन घाडगे यांनी सांगितले की, पोलीस वर्धापन दिनाचे महत्त्व, बालविवाह रोखण्यासाठी पोलीस पाटलांनी पोलीस ठाण्यात माहिती देण्याबाबत सूचना केल्या आहेत. तसेच जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार असल्याबाबत माहिती दिली. आगामी निवडणूक जिल्हा परिषद - पंचायत समिती अनुषंगाने मार्गदर्शन केले आहे.




नशा मुक्ती, सायबर क्राईम, मार्गदर्शन केले आहे. मकर संक्रांत, माघी गणेशोत्सव, २६ जानेवारी - २०२६, सुरक्षा चे अनुषंगाने मार्गदर्शन केले आहे.

गावातील अडीअडचणीवर चर्चा करून गावातील ज्येष्ठ नागरिक, महिला, मुले यांच्या सुरक्षेच्या अनुषंगाने माहिती दिली आहे. गावातील व परिसरातील संशयित वस्तू, वाहने, व्यक्तीची माहिती देणे, अवैद्य धंद्यांची माहिती देणे, भाडेकरूंची माहिती देणे व उउद्धत बसविणे बाबत सोसायटी पदाधिकारी यांना माहिती देणे. हेल्पलाईन नंबर - डायल ११२, सायबर क्राईम हेल्पलाइन नंबर - १९३०, १९४५ . कोस्टल गार्ड हेल्पलाइन नंबर- १०९३ पोलीस बतावणी बाबत जनजागृती करणे. व्यक्ती/ कुटुंब यांना वाळीत टाकणे असा प्रकार होणार नाही याची दक्षता घेणे. बैठकीत वरील प्रमाणे सूचना व मार्गदर्शन करण्यात आले आहे. बैठकीस ४१ पोलीस पाटील उपस्थित होते.

# बाधित शेतकऱ्यांना योग्य मोबदला द्या

## जिल्हाधिकाऱ्यांच्या महापारेषण अधिकाऱ्यांना सूचना

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणेजवळील कानसई ते वडखळपर्यंतच्या शेतकऱ्यांच्या शेतजमिनीवर महापारेषणने (एमएसईबी) टॉवर व लाईन टाकली आहे. या पार्श्वभूमीवर बाधित शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळावा म्हणून जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये गुरुवारी (दि. ८) त्यांच्या कार्यालयात बैठक झाली. या वेळी जिल्हाधिकाऱ्यांनी महापारेषणच्या अधिकाऱ्यांना बाधित शेतकऱ्यांना उचित मोबदला मिळाला पाहिजे, अशा सूचना केल्या.



रिलायन्स नागोठणे आणि जेएसडब्ल्यू वडखळ या कंपन्यांसाठी टॉवर व लाईन ही टाकली जात आहे. त्यासाठी ३५ मीटर एवढी जागा संपादित करून मोठ, मोठे टॉवर बसविण्यात आले, मात्र शेतकऱ्यांना मोबदला मिळालेला नाही. म्हणून जिल्हाधिकारी जावळे यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक झाली.

या बैठकीस उपजिल्हाधिकारी श्रीकांत गायकवाड, महापारेषणचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता मिथुन रामटेके गायकवाड, ॲड. मानसी म्हात्रे, किशोर म्हात्रे, गणपत म्हात्रे, पांडुरंग म्हात्रे, संतोष म्हात्रे, मधुकर ठाकूर, मिलिंद डाकी, राकेश म्हात्रे, नथुराम पाटील, हर्षल ढमाळ, ॲड. गणेश जाधव, प्रशांत भोईर, दत्ताराम करजेकर, मंगेश जाधव आदींसह कानसई ते वडखळपर्यंतचे बाधित शेतकरी उपस्थित होते.

याबाबत अधिक माहिती अशी आहे की, महापारेषणने यापूर्वी टाकलेली लाईन ही २२० केव्हीची आहे आणि आता ४६ मीटर एवढ्या जागेचे क्षेत्र वाढणार असून ४०० केव्हीची लाईन टाकण्यात येणार आहे. यामध्ये पूर्वीची जी २२० केव्हीची लाईन आहे, त्या लाईनखालून शेतीतील कामासाठी लागणारी औजारे घेऊन शेतकरी शेतीवर जात असताना शॉक लागतो तसेच पावसाळी त्या लाईनखालून छत्री घेऊन जाणाऱ्या व्यक्तीलादेखील शॉक लागतो. नवीन येणारी लाईन ४०० केव्हीची आहे. त्यामुळे या लाईनच्या आजूबाजूच्या शेतकऱ्यांच्या जीवितासही धोका निर्माण होण्याची शक्यता आहे.

जिल्हाधिकाऱ्यांनी बैठकीत बाधित शेतकऱ्यांना चांगला मोबदला मिळाला पाहिजे, शेतकऱ्यांबरोबर संपर्क साधून ले आऊट करून जागा निश्चित करावी, शेतकऱ्यांना डावलून कोणतेही काम करू नये, अशा सूचना केल्या. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

# रोह्यात प्लास्टिकबंदी जनजागृती रॅली

**रोहा : प्रतिनिधी**

रोहा अष्टमी नगरपरिषदेच्या वतीने प्लास्टिकबंदीच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शुक्रवारी (दि. ९) भव्य जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

या वेळी बोलताना नगराध्यक्ष वनश्री शेडगे यांनी, नागरिकांनी बाजारात खरेदीसाठी जात असताना कागद व कापडी पिशव्या बाजारात घेऊन जावे. प्लास्टिक पिशव्या टाळाव्यात, असे आवाहन करीत या रॅलीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनांवर बालवयातच पर्यावरणाबाबत जागृती होत असल्याचे सांगितले.

रॅलीत मुख्याधिकारी अजयकुमार एडके, पोलीस निरीक्षक मारूती पाटील, माजी नगराध्यक्ष समीर शेडगे, गटनेते महेंद्र गुजर, नगरसेवक महेश कोलाटकर, अहमद दर्जी, राजेंद्र जैन, मयुर दिवेकर, रवींद्र चाळके, प्रशांत कडू, रोशन चाफेकर, पूर्वा मोहिते, अरबाज मणेर, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते गजानन मळेकर, अप्पा शेडगे, सुखद राणे, जालिंदर शेवाळे, प्रेषीत बारटक्के, स्वप्नील धनावडे, अलिम मुमेरे, अमित गुजर, कुलदिप वेदपाठक, सुनील कोठारी, विनीत वाकडे, सुरेंद्र निंबाळकर यांच्यासह नागरिक, नगर परिषद कर्मचारी, शिक्षक, व्यापारी, विविध सामाजिक संस्थेचे कार्यकर्ते आणि विद्यार्थ्यांचा समावेश होता.

या वेळी नगर परिषद प्राथमिक शाळा क्र.१च्या विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर केले तसेच विद्यार्थी मोठ्या प्रमाणात हातात प्लास्टिकबंदीबाबतचे फलक घेऊन उपस्थित होते.



# अनधिकृत, विनातिकीट प्रवास रोखण्यासाठी उपाययोजना

## वर्षभरात १८३.१६ कोटींचा दंड वसूल

**रोहा : प्रतिनिधी**

मध्य रेल्वे द्वारे आपल्या प्रवाशांना सुरक्षित, सुरळीत आणि आरामदायक प्रवासाचा अनुभव देण्याच्या तटस्थ वचनबद्धते अंतर्गत, अनधिकृत व विनातिकीट प्रवासावर आळा घालण्यासाठी उपाययोजना अधिक तीव्र करण्यात आल्या आहेत.या तीव्र व नियोजित तिकीट तपासणी मोहिमेद्वारे, आर्थिक वर्ष २०२५-२६ (एप्रिल ते डिसेंबर २०२५) दरम्यान मध्य रेल्वेने लक्षणीय परिणाम साधले आहेत. आर्थिक वर्ष २०२५-२६ दरम्यान ३०.७५ लाख अनधिकृत व विनातिकीट प्रवाशांकडून १८३.१६ कोटी रुपयांचा दंड वसूल करण्यात आले आहे.



मध्य रेल्वेच्या विशेष तिकीट तपासणी पथकांनी आर्थिक वर्ष २०२५-२६ (एप्रिल ते डिसेंबर २०२५) दरम्यान ३०.७५ लाख प्रवाशांना, जे विनातिकीट किंवा अपूर्ण/अवैध तिकीटासह प्रवास करत होते त्यांना अटक केली. मागील आर्थिक वर्षातील याच काळात २८.०१ लाख प्रवाशांची अटक झाल्यामुळे ही संख्या सुमारे १०% ने वाढली आहे.

आर्थिक वर्ष २०२५-२६ (एप्रिल ते डिसेंबर २०२५) दरम्यान दंड म्हणून १८३.१६ कोटी रुपये रक्कम वसूल झाली, मागील आर्थिक वर्षाच्या याच काळात वसूल झालेल्या १५१.९९ कोटी रुपयांपेक्षा ही रक्कम २०%पेक्षा जास्त वाढलेली आहे.

डिसेंबर २०२५ महिन्यात मध्य रेल्वेच्या तिकीट तपासणी पथकाने ३.२४ लाख प्रवाशांना, जे विनातिकीट किंवा अपूर्ण/अवैध तिकिटासह प्रवास करत होते त्यांना अटक केली, तर डिसेंबर २०२४ मध्ये ही संख्या २.९३ लाख होती, ज्यामध्ये सुमारे १०% पेक्षा जास्त वाढ दर्शवते.

डिसेंबर २०२५ महिन्यात विनातिकीट प्रवाशांकडून दंड म्हणून १८.२५ कोटी रुपये वसूल झाले, तर डिसेंबर २०२४मध्ये ही रक्कम १३.५५ कोटी रुपये होती, ज्यामध्ये सुमारे ३५% वाढ झाल्याचे दिसून येते.

आर्थिक वर्ष २०२५-२६ (एप्रिल ते डिसेंबर २०२५) साठी विभागानुसार तपशील तसेच विनातिकीट/अवैध तिकीटासह प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या व त्यांच्याकडून वसूल केलेली दंड रक्कम विभागनीय पहाता भुसावळ विभागात ७.५४ लाख प्रकरणांमधून ६३.८३ कोटी रुपये, मुंबई विभागात १२.८२ लाख प्रकरणांमधून ५५.१२ कोटी रुपये,पुणे विभाग: ३.४१ लाख प्रकरणांमधून २०.८४ कोटी रुपये,नागपूर विभागात ३.३३ लाख प्रकरणांमधून २०.७५ कोटी रुपये,सोलापूर विभागात १.८१ लाख प्रकरणांमधून ८.३९ कोटी रुपये मुख्यालया अंतर्गत १.८३ लाख प्रकरणांमधून १४.२२ कोटी रुपये दंड वसूल करण्यात आले.

मध्य रेल्वेने अनधिकृत प्रवासी शोधण्यासाठी बहुआयामी धोरण अवलंबले आहे, ज्यामध्ये स्थानक तपासणी, सापळा तपासण्या, किल्ला तपासण्या, सखोल तपासण्या आणि मेगा तिकीट तपासणी मोहिमा यांचा समावेश आहे. ही कार्यवाही सर्व विभागांमध्ये मेल/एक्सप्रेस गाड्या, स्थानकगाड्या, विशेष गाड्या तसेच मुंबई व पुणे विभागातील उपनगरी गाड्यांवर केली जाते.

मध्य रेल्वे प्रवाशांकडे आवाहन करत आहे की, अधिकृत विक्रेत्या किंवा स्थानक बुकिंग काउंटर, -द्वतच् किंवा वेबसाईट http://www.irctc.co.in(http://www.irctc.co.in) द्वारे जारी केलेल्या वैध तिकिटांसहच प्रवास करा. प्रवासी त्यांच्या मोबाईल फोनवर रेल वन ॲप डाउनलोड करून त्याद्वारे तिकीट बुक करू शकतात.

# कुरूळ येथे आज भजन महोत्सव

**अलिबाग : प्रतिनिधी**

क्षात्रैक्य समाज अलिबाग या संस्थेच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त शनिवारी (दि. १०) अखंड भजन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. संस्थेच्या कुरूळ येथील सभागृहात होणाऱ्या स्व. प्रभाकर सदाशिव राणे स्मृती भजन महोत्सवात निमंत्रित दहा भजन मंडळे सहभागी होणार आहेत.

अलिबाग तालुक्यातील जागृती पाटील (वेलवली) जयवंत पाटील व संदीप पाटील (कुरूळ), प्रकाश नाईक (बेलकडे), चेतन पाटील (सहाण), भूषण माळवी व दयानंद भगत (आवास), समर्थ पाटील (वायशेत), नरेश कडू (वाडगाव) निलेश जंगम (वेश्वी) नितीन पाटील (मापगाव) आपल्या भजन मंडळासह सहभागी होणार आहेत. याशिवाय प्रसिद्ध भजन गायिका प्रणिता देशमुख (कर्जत) यांनाही निमंत्रित केले आहे. प्रसिद्ध पखवाज वादक सुशांत पाटील हे शिष्यवृंदासोबत सहवादन करणार आहेत. शेवटी चक्रीभजन जुगलबंदीचा कार्यक्रम होईल. यात आदिनाथ सटले (आळंदी) आणि महेश कंठे (मुरबाड) हे दोन कलावंत सहभागी होणार आहेत. या भजन महोत्सवाचा घ्यावा, असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष द्वारकानाथ नाईक, सचिव प्रदीप नाईक आणि भजन महोत्सव समिती प्रमुख ॲड. प्रसाद पाटील यांनी केले आहे.

# तळेगाव ग्रामपंचायतीने महिला बचत गटांमार्फत बांधला वनराई बंधारा

**तळा : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत ग्रामपंचायत तळेगावने महिला बचत गटांनी श्रमदानातून गणपती विसर्जन घाटाजवळील नदीवर वनराई बंधारा बांधला. उन्हाळ्यातील पाणी समस्येवर हा उपाय ठरणार आहे.

या वेळी तळेगाव ग्रामपंचायतीच्या सरपंच रेणुका चाळके, ग्रामपंचायत अधिकारी आर.व्ही. करमत, सदस्य कुंदा शेलार, कर्मचारी, बचत गटाच्या महिला आदी उपस्थित होते.

बचत गटांनी बांधलेल्या बंधाऱ्यामुळे जमितील पाणी पातळी वाढण्यास उपयोग होईल तसेच गुरांसाठी पाणी, कपडे धुण्यासाठी याचा उपयोग होणार आहे. असेच बंधारे बांधले तर जमिनीची पाणीपातळी वाढण्यास मदत होणार आहे तसेच जमीनीत ओलावा राहण्यास मदत होऊन शेतकऱ्यांना भाजीपाल्याची पिकेही घेता येतील.



# थॅलेसेमिया जनजागृतीसाठी जनकल्याण रक्तपेढीचे अभियान

**महाड : प्रतिनिधी**

थॅलेसेमियामुक्त भारत करण्यासाठी शासकीय स्तरावर अभिमान राबवले जात आहे. कै. काकासाहेब चितळे संचालित महाड जनकल्याण रक्तपेढीनेदेखील या अभियानामध्ये सहभागी होऊन रायगड जिल्ह्यामध्ये या आजाराविषयी जनजागृती अभियान राबविण्यास सुरुवात केले आहे.

याच पार्श्वभूमीवर घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेमध्ये रायगड जिल्हा थॅलेसेमिया जनजागरण समितीच्या प्रमुख डॉ. वैशाली मिंडे यांनी या आजाराची गंभीरता, काळजी व प्रतिबंध याविषयी माहिती दिली.

थॅलेसेमिया या आजाराची जनजागृती करण्याच्या चळवळीमध्ये जनकल्याण रक्तपेढीने सहभाग घेतला असून महाड येथील जनकल्याण रक्तपेढीमध्ये पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या पत्रकार परिषदेला रायगड जिल्हा थॅलेसेमिया जनजागरण



समितीच्या प्रमुख डॉ. वैशाली मिंडे, जिल्हा समन्वयक अविनाश घोलप, जनकल्या रक्तपेढीचे कार्याध्यक्ष शिवराज भागवत, अध्यक्ष धनंजय परांजपे, समिती सदस्य प्रदीप शेठ आदी उपस्थित होते.

या वेळी माहिती देताना डॉ. मिंडे म्हणाल्या की, हा रक्ताचा आजार असून या आजारामध्ये मूल जन्माला आल्यानंतर त्याच्या रक्तातील हिमोग्लोबिनचे प्रमाण अत्यंत कमी असल्याने अशी बालके कमजोर व त्यांची वाढ मंदावलेली दिसते. या आजारामध्ये मायनर व मेजर असे दोन प्रकार असून मायनर हे या आजाराचे वाहक आहे. हा आजार अनुवंशिक असून आई-वडिलांकडून जन्मलेल्या मुलाला तो जनूकांमधून होत असतो. या आजारग्रस्त बालकांना दर २१ दिवसांनी रक्त चढवावे लागते. समाजामध्ये या आजाराचे प्रमाण सध्या वाढत असून ही एक मोठी गंभीर समस्या भारतीय समाजासमोर उभी आहे. अशा रुग्णांना महाडमधील जनकल्याण रक्तपेढीच्या वतीने मोफत रक्तपुरवठा केला जात असून यासाठी प्रत्येक रुग्णासाठी वर्षाला जवळपास अडीच लाख इतका खर्च होत आहे.

शासकीय स्तरावरदेखील या आजाराबाबत जनजागृती होत असून शासकीय रुग्णालयांमध्ये यासाठी मोफत रक्त तपासणी व या रुग्णांना शासकीय सवलती मिळत आहेत. या रुग्णांची अपंग म्हणून नोंद होत असून तशा सवलतीही मिळत आहेत. या आजाराची बालके जन्माला येऊ नयेत यासाठी समाजातील प्रत्येक जाती धर्मामध्ये होणाऱ्या विवाहपूर्वी रक्ताची तपासणी करून या आजारावर नियंत्रण आणता येईल, असे डॉ. मिंडे यांनी सांगितले.

जनकल्याण रक्तपेढीचे कार्याध्यक्ष शिवराज भागवत यांनी, या आजाराच्या अभियानात एकूण तीन टप्प्यांमध्ये काम केले जात आहे. यामध्ये जवळपास १० हजार बालकांचा समावेश असून या बालकांची काळजी घेणे हा पहिला टप्पा आणि दुसरा टप्पा हा जनजागृतीचा आहे. लोकांमध्ये जनजागृती करून अभियान राबवले जात आहे. तिसरा टप्पा म्हणजे याला प्रतिबंध करण्याचे प्रकार की ज्यामध्ये विवाहपूर्वी रक्त तपासणी करणे गरजेचे असून प्रत्येक जोडप्याने अशा प्रकारची तपासणी करावी हा या अभियानाचा मुळ उद्देश आहे, असे सांगितले.

यासाठी जनकल्याण रक्तपेढीने पुढाकार घेतला असून १८ रक्तपेढ्यांच्या माध्यमातून साखळी निर्माण केली आहे. थॅलेसेमिया मुक्त भारत करण्यासाठी शंभर संस्था एकत्रित अभियान चालवत आहेत. यासाठी कै. काकासाहेब चितळे संचालित महाड येथील जनकल्याण रक्तपेढीच्या वतीने २० प्रबोधन कार्यक्रम, ५८ संस्थांना भेटी, १२२ व्यक्तिगत प्रमुख व्यक्तींच्या गाठीभेटी, १३ विशेष उपक्रम व १५२० विद्यार्थ्यांपर्यंत संपर्क करून या आजाराविषयी जनजागृती केली जात असल्याची माहितीही भागवत यांनी दिली.

# शासकीय अधिकाऱ्यांसाठीही ई-रिक्षाच्या नियोजित स्टॉपवरच उतरण्याचा नियम असावा

## माथेरानकरांची मागणी

**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरानमध्ये ई-रिक्षा सुरू होऊन पर्यटन क्रांती घडत असली तरीसुद्धा या रिक्षांच्या कमी संख्येमुळे पर्यटकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे.



दररोज या सेवेचा लाभ असंख्य पर्यटकांसह नागरिक घेत असतात. स्वस्त आणि कमी वेळात प्रवास करण्याची एक उत्तम सुविधा ई-रिक्षाच्या माध्यमातून उपलब्ध झाली आहे. त्यामुळे पर्यटक आपल्या मुलाबाळांना, कुटुंबातील वयोवृद्ध सदस्यांना सोबत घेऊन या स्थळाची एक ते दोन दिवसांसाठी सहल करीत असतात. केवळ २० रिक्षांपैकी सात ते आठ रिक्षा सुरू असतात. काही रिक्षा चार्जिंगसाठी लावण्यात येतात, तर काही तांत्रिक बिघाडामुळे बंद असतात. त्यामुळे पर्यटकांना तासन्‌तास ई-रिक्षाची प्रतीक्षा करावी लागते.

एखाद्या अधिकाऱ्यांचा फोन आला की ताबडतोब त्यांना सेवा देण्यासाठी धावपळ सुरू असते. हे शासकीय अधिकारी मोबदला देतात की मुक्तसंचार करतात

### बंद रिक्षांचा वापर करण्याचा पर्याय

**माथेरानमध्ये सुरुवातीला पायलट प्रोजेक्टवेळी सात ई-रिक्षा आणल्या होत्या, परंतु संघटनेच्या एकूण ९४पैकी काही सदस्यांना २० ई-रिक्षा देण्यात आल्या आहेत. त्यामुळे त्या सात रिक्षा सद्यस्थितीत बंद करण्यात आल्या आहेत. अधिकाऱ्यांनासुद्धा सुविधा उपलब्ध असावी यासाठी त्यांनी स्वतः शासनाकडे सनियंत्रण समितीकडे मागणी करून बंद रिक्षा स्वतःच्या कार्यालयीन कामकाजाच्या वापरासाठी सुरू करून घेतल्यास कुणालाही अडचण निर्माण होणार नाही, असेही स्थानिकांमधून बोलले जात आहे.**

हा जरी संघटनेचा विषय असला तरी जे प्रवासी तासन्‌तास रांगेत उभे राहतात त्यांचा हिरमोड होत असून रिक्षा स्टँडवर अनकेदा वाद निर्माण होत आहेत.

दस्तुरी येथून येणाऱ्या सर्व प्रवाशांना रेल्वे स्टेशनजवळील स्टॉपवर सोडण्यात येते. मग शासकीय अधिकाऱ्यांना त्यांच्या कार्यालयापर्यंत नेण्याचे लाड का सुरू आहेत. भरमसाठ वेतन घेऊनसुद्धा जर काही अधिकारी मोफत या सेवेचा लाभ उठवत असतील तर हे चुकीचे असून त्यांना अशा प्रकारे सुविधा देण्यास ते काही या गावाचे जावई आहेत का, असाही प्रश्न स्थानिकांमधून उपस्थित केला जात आहे.

# दहावीतील विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन शिबिर

**मुरूड : प्रतिनिधी**

पिटसई येथील अशोक लोखंडे विद्यालयातील इयत्ता दहावीमधील विद्यार्थ्यांना दहावीमध्ये चांगले गुण मिळवण्यासाठी प्रश्नपत्रिका कशी सोडवायची याबाबत स्मार्ट टिप्स व तसेच बदलत्या काळाशी सामना करण्यासाठी नवीन आलेले एआयचे तंत्रज्ञान शालेय विद्यार्थ्यांना कळावे यासाठी एक विशेष मार्गदर्शन शिबिर घेण्यात आले.



या कार्यक्रमाबाबत शालेय विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी 'एमकेसीएल'चे विशेष प्रतिनिधी ज्ञानेश्वर पाटील यांनी सखोल मार्गदर्शन केले. इयत्ता दहावी बोर्ड परीक्षेचा सराव कसा करावा, प्रश्नपत्रिका सोडवताना कोणते मुद्दे कसे सोडवावेत, प्रश्नपत्रिकेत कोणत्या प्रश्नाला किती वेळ द्यावा, कोणते प्रश्न सोडवावेत, उत्तर कशा पद्धतीने लिहावे, वेळेची बचत व नियोजन याबद्दल पाटील यांनी छान माहिती दिली.त्याचवेळी एआयचे बदलते जग, कोणती माहिती कशी मिळवावी,फोटो अपडेड कसे करावे, बॅनर कसे बनवावे, फोटो मार्जिन कसे करावे याबाबतही त्यांनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमास मुख्याध्यापक अरुण खुळपे, कृष्णा कॉम्प्युटर इन्स्टिटट्यूटचे मालक उमेश आवासकर, कॉम्प्युटर शिक्षिका सौ. बारटक्के, ज्येष्ठ शिक्षक अकील मुलाणी, संदीप इंगावले, वरिष्ठ लिपिक दीपक भोसले, नीलम गोळे आदी उपस्थित होते.

या वेळी विद्यार्थ्यांना एमकेसीएलकडून प्रश्नपत्रिका संच, फाईल व बॉलपेन गिफ्ट म्हणून देण्यात आले.

# महाराष्ट्राचा गोव्यावर रोमांचक विजय

## रामकृष्ण घोषची जादुई गोलंदाजी



**जयपूर : वृत्तसंस्था**

विजय हजारे ट्रॉफीच्या एलिट ग्रुप सी मधील एका हाय-व्होल्टेज सामन्यात महाराष्ट्राने शेवटच्या षटकांत झालेल्या रोमांचक सामन्यात गोव्याचा पाच धावांनी पराभव करून सर्वांना चकित केले. हा सामना खऱ्या अर्थाने गोलंदाजाची परीक्षा होती. महाराष्ट्राचा अष्टपैलू खेळाडू रामकृष्ण घोष याने शेवटच्या षटकात जादुई गोलंदाजीने आपल्या संघाचा विजय निश्चित केला.

रामकृष्ण घोषच्या सहा जादुई चेंडूमुळे गोवा संघ लक्ष्यापासून फक्त पाच धावांनी दूर राहिला. सामन्याचा खरा नाट्यमय क्षण शेवटच्या षटकात उलगडला. गोव्याला जिंकण्यासाठी फक्त सहा धावांची आवश्यकता होती आणि त्यांची एक विकेट शिल्लक होती. या महत्त्वाच्या क्षणी रामकृष्णने गोलंदाजीला सुरुवात केली. त्याने दबावाखाली उत्कृष्ट नियंत्रण ठेवले आणि संपूर्ण षटकात एकही धाव दिली नाही. निर्धाव ओव्हर टाकत त्याने महाराष्ट्राला पाच धावांनी संस्मरणीय विजय मिळवून दिला. रामकृष्णने १० षटकांत फक्त ३५ धावा दिल्या आणि एक गडी बाद केला.

सामन्यात महाराष्ट्राने प्रथम फलंदाजी करताना ५० षटकांत सात गडी गमावून २४९ धावा केल्या होत्या. यामध्ये ऋतुराज गायकवाडचे शतक होते. ऋतुराजने कर्णधारपदाला साजेशी १३४ धावांची खेळी केली, तर विकी ओस्तवालने ५३ धावांचे योगदान दिले. प्रत्युत्तरादाखल गोव्याने दमदार सुरुवात केली. कश्यप बखले आणि स्नेहल कौथनकर यांनी पहिल्या विकेटसाठी ८३ धावा जोडल्या, पण त्यानंतर डाव डळमळीत झाला आणि संघाने २२१ धावांत नऊ गडी गमावले. नंतर ललित यादवने गोव्याचा डाव सावरला आणि त्याने ६७ चेंडूत नाबाद ५७ धावा केल्या. वासुकी कौशिकनेही त्याला साथ दिली, पण ही जोडी संघाला विजय मिळवून देऊ शकली नाही.

### सीएसकेकडून यंदाही संधी

रामकृष्ण घोष आयपीएलमध्ये चेन्नई सुपर किंग्ज (सीएसके) कडून खेळताना दिसेल. रामकृष्ण आयपीएल २०२५मध्ये सीएसके संघात दाखल झाला. संघाने लिलावात त्याच्यावर ३० लाख रुपये खर्च केले. तथापि, त्याला एकही सामना खेळण्याची संधी मिळाली नाही. तरीही त्याला आयपीएल २०२६ साठी कायम ठेवण्यात आले. संघ व्यवस्थापनाचा हा विश्वास या वर्षी फायदेशीर ठरू शकतो आणि तो आयपीएलमध्ये पदार्पण करताना दिसू शकतो.

# उरणची नेमबाज अवनी कोळीकडून पदकांचा वेध



**उरण : प्रतिनिधी**

डॉ. कर्णिसिंग शूटिंग रेंज दिल्ली येथे झालेल्या ६८व्या राष्ट्रीय शॉटगन डबल ट्रॅप ज्युनिअर वूमन टीम व यूथ वूमन टीममध्ये उरणची नेमबाज अवनी कोळी हिने सुवर्णपदक आणि वैयक्तिक ज्यु अँड युथमध्ये कांस्यपदक मिळवले.

याशिवाय कार्तिकी देवळेकर व वरा देवळेकर यांनी स्पर्धेत महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधित्व करत विख्यात नेमबाज रिनॉल्ड शूटर ही पदवी संपादन केली. तिघी जणी सिद्धांत रायफल क्लबच्या मेंबर आहेत.

शिक्षण संस्थेच्या फुंडे येथील वीर वाजेकर महाविद्यालयाची एफवायबीएससीआयटीची विद्यार्थिनी असलेली अवनी कोळी ही प्रशिक्षक रॅलस्टॅन कोईलो यांच्याकडे प्रशिक्षण घेत आहे.

या यशाबद्दल 'रयत'चे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, उपाध्यक्ष पी.जे. पाटील, कॉलेज विकास समितीचे अध्यक्ष बाळाराम पाटील, सुधीर घरत, प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर, सर्व शिक्षकांसह जिमखाना प्रमुख देवेंद्र कांबळे व सदस्य तसेच क्लबचे अध्यक्ष विजय खारकर, सचिव व प्रशिक्षक राष्ट्रीय नेमबाज किशन खारके, प्रितम पाटील, महेश फुलोरे, अजिंक्य चौधरी, समाधान घोपरकर, किरण माळी, अविनाश भगत, सूरज थळे, किरण मोहिते, प्रशिक्षक अलंकार कोळी यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

# ऋतुराजचे एकाच सामन्यात अनेक विक्रम



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

ऋतुराज गायकवाडने विजय हजारे ट्रॉफीमध्ये १३१ चेंडूत १३४ धावांची दमदार खेळी करत लिस्ट ए क्रिकेटमधील अनेक विक्रम मोडले आहेत. ऋतुराजने आपल्या खेळीदरम्यान संयम, टायमिंग आणि वर्चस्वाचा नमुना सादर केला.

महाराष्ट्र विरूद्ध गोवा सामन्यात ऋतुराज गायकवाडने शतक ठोकत महाराष्ट्राच्याच अंकित बावणेच्या विक्रमाशी बरोबरी केली. विजय हजारे ट्रॉफीत सर्वाधिक शतकी खेळी करणाऱ्यांच्या यादीत आता ऋतुराज अव्वल स्थानावर आहे. त्याने ५७ डावात १५ शतकी खेळी केल्या आहेत. ९४ डावात १५ शतके ठोकणारा अंकित बावणे दुसऱ्या स्थानावर आहे, तर देवदत्त पडिक्कल (१३) आणि मयांक अग्रवाल (१३) हे तिसऱ्या आणि चौथ्या क्रमांकावर आहेत.

ऋतुराजने या शतकासोबतच अजून एक भन्नाट विक्रम आपल्या नावावर केला आहे. ऋतुराज हा आता लिस्ट ए क्रिकेटमध्ये सर्वात वेगाने २० शतके ठोकणारा खेळाडू बनला आहे. त्याने ९५ डावात ही कामगिरी करून दाखवली. यापूर्वी कोणत्याही फलंदाजाला १०० सामन्यांच्या आत २० शतके ठोकणे जमलेले नाही. यापूर्वी लिस्ट ए क्रिकेटमध्ये सर्वात वेगवान २० शतके ठोकण्याचा विक्रम मयांक अग्रवाल आणि खुर्रम मंझूर यांच्या नावावर होता. त्या दोघांनी १२९ डावात ही कामगिरी केली होती, तर विराट कोहली आणि बाबर आझम यांना लिस्ट ए क्रिकेटमध्ये २० शतके ठोकण्यासाठी अनुक्रमे १४३ आणि १३१ सामने खेळावे लागले होते.

महाराष्ट्र गोवा विरूद्धच्या सामन्याबद्दल बोलायचे झाले तर महाराष्ट्राने ७ बाद २४९ धावा केल्या आणि सामना तीन धावांनी जिंकला. या सामन्यादरम्यान ऋतुराजने अजून एक विक्रम आपल्या नावावर केला. तो लिस्ट ए क्रिकेटमध्ये सर्वात वेगाने पाच हजार धावा पूर्ण करणारा खेळाडू ठरला.

# सरफराज खानने अवघ्या १५ चेंडूत ठोकले अर्धशतक



**मुंबई : प्रतिनिधी**

टीम इंडियाबाहेर असलेल्या सरफराज खान याने विजय हजारे ट्रॉफी स्पर्धेत आक्रमक अंदाजातील फटकेबाजीसह पुन्हा एकदा लक्ष वेधून घेतले आहे. पंजाबविरुद्धच्या सामन्यात मुंबईच्या संघाकडून खेळताना त्याने अवघ्या १५ चेंडूत अर्धशतक साजरे केले. या कामगिरीसह विजय हजारे ट्रॉफी स्पर्धेत सर्वात जलदगतीने अर्धशतक झळकावण्याचा विक्रम आता सरफराजच्या नावे झाला आहे.

देशांतर्गत क्रिकेटमधील सर्वात प्रतिष्ठित अशा विजय हजारे ट्रॉफी स्पर्धेत याआधी सर्वात जलद अर्धशतकी खेळीचा विक्रम हा अतित शेठ याच्या नावे होता. २०२०-२१ च्या हंगामात त्याने बडोदा संघाकडून खेळताना छत्तीसगडविरुद्धच्या सामन्यात १६ चेंडूत अर्धशतक झळकावले होता. त्याला मागे टाकत सरफराज खान याने नवा विक्रम प्रस्थापित केला आहे.

पंजाबविरुद्धच्या सामन्यात सरफराज खान पहिल्या चेंडूपासून आक्रमक अंदाजात खेळताना दिसला. १०वे षटक घेऊन आलेल्या अभिषेक शर्माच्या एका षटकात त्याने तब्बल ३० धावा कुटल्या. मयांक मार्कंडे याने सरफराजच्या वादळी खेळीला ब्रेक लावला. सरफराजने २० चेंडूत ३१०च्या स्ट्राईक रेटसह ६२ धावा केल्या. त्याची ही खेळी सात चौकार आणि पाच षटकारांनी बहरलेली होती.

पंजाबच्या संघाने दिलेल्या २१७ धावांचा पाठलाग करताना अंगकृष रघुवंशी आणि मुशीर खान यांनी मुंबईच्या संघाच्या डावाची सुरुवात केली. दोघांनी पहिल्या विकेटसाठी अर्धसतक भागीदारी रचली. धाकटा भाऊ मुशीर खान २२ चेंडूत २१ धावा करून बाद झाल्यावर सरफराज खान मैदानात आला. पहिल्या चेंडूपासून तो प्रतिस्पर्धी संघातील गोलंदाजांवर तुटून पडला. सरफराजची विक्रमी खेळी बीसीसीआय निवडकर्त्यांना पुन्हा एकदा त्याच्याबद्दल विचार करायला भाग पाडणारी अशीच आहे.

सर्फराजचा हा आक्रमक अंदाज चेन्नई सुपर किंग्सच्या संघासाठीही मोठा दिलासा देणारा आहे, कारण मिनी लिलावात अनसोल्ड राहिल्यावर सीएसकेच्या संघाने सरफराजवर भरवसा दाखवला होता.

# विम्बल्डन विजेती युजीन टेनिस सोडून पिकल बॉल खेळणार



**फ्लोरिडा : वृत्तसंस्था**

पिकलबॉल हा खेळ सध्या झपाट्याने लोकप्रिय होत आहे. टेनिस, बॅडमिंटन आणि टेबल टेनिस या खेळांचे मिश्रण असलेला हा खेळ सर्वच वयोगटांत आवडीने खेळला जात आहे. अशातच विम्बल्डन स्पर्धेतील अंतिम फेरीत खेळलेली टेनिस खेळाडू युजीन बोचार्ड हिनेही पिकल बॉलची निवड केली आहे.

आपल्या कारकिर्दीच्या महत्त्वाच्या टप्प्यावर विचारपूर्वक घेतलेला हा निर्णय असल्याचे बोर्चाडने स्पष्ट केले. 'द किचन पिकलबॉल'शी बोलताना ती म्हणाली, २०२३ मध्ये यूएस ओपनच्या वेळेस याबाबत चर्चा सुरू झाली होती. माझे एजंट्स माझ्याकडे आले आणि त्यांनी सांगितले की पीपीए (प्रोफेशनल पिकलबॉल असोसिएशन) काही टेनिस खेळाडूंना पिकलबॉलकडे वळवण्याचा प्रयत्न करत आहे.

मी यावर शांतपणे विचार केला. बराच काळ व्यावसायिक टेनिस खेळत आली. जीवनशैलीच्या दृष्टीनेही हा बदल महत्त्वाचा ठरल्याचे बोचार्डने सांगितले. टेनिस सोडून पिकल बॉलकडे वळताना फारसा विचार न करता संधी स्वीकारण्यावर भर दिल्याचेही तिने सांगितले.

# मलेशिया ओपन : सिंधूसह सात्त्विक-चिराग उपांत्यपूर्व फेरीत





**क्वालालंपूर : वृत्तसंस्था**

स्टार बॅडमिंटनपटू पी.व्ही. सिंधूने जपानच्या टोमोका मियाझाकीचा पराभव करत मलेशिया ओपन स्पर्धेतील महिला एकेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली, मात्र पुरुष एकेरीत भारताचे आव्हान संपुष्टात आले.

दुखापतीतून सावरल्यानंतर पुनरागमन करणाऱ्या सिंधूने महिला एकेरीत आठव्या मानांकित मियाझाकीचा केवळ ३३ मिनिटांत २१-८, २१-१३ असा सहज पराभव केला. दोन वेळची ऑलिम्पिक पदक विजेती सिंधू आता उपांत्यपूर्व फेरीत तिसऱ्या मानांकित जपानी खेळाडू अकाने यामागुचीशी दोन हात करेल.

भारताची अव्वल पुरुष दुहेरी जोडी सात्त्विकसाईराज रँकीरेड्डी आणि चिराग शेट्टी यांनीही स्पर्धेत आपला दबदबा कायम ठेवला आहे. त्यांनी मलेशियाच्या जागतिक क्रमवारीत १७व्या स्थानी असलेल्या जुनैदी आरिफ आणि रॉय किंग याप जोडीवर २१-१८, २१-१२ असा विजय मिळवत उपांत्यपूर्व फेरीत स्थान निश्चित केले.

आशियाई क्रीडा स्पर्धेतील सुवर्णपदक विजेत्या या भारतीय जोडीने मलेशियाच्या जोडीविरुद्ध ४-० असे सरस रेकॉर्ड कायम ठेवले. पुढील फेरीत त्यांचा सामना चिनी तैपेईच्या चेन झी रे-लिन यू चिह आणि सहाव्या मानांकित इंडोनेशियाच्या फजर अल्फियान-फिकरी मुहम्मद यांच्यातील विजेत्याशी होईल.

***पुरुष एकेरीत आव्हान संपुष्टात***

भारताच्या पुरुष एकेरीतील खेळाडूंची निराशा झाली. लक्ष्य सेन आणि युवा आयुष शेट्टी या दोघांनाही उपउपांत्यपूर्व फेरीत (प्री-क्वार्टर फायनल) पराभवाला सामोरे जावे लागले. लक्ष्य सेनला हाँगकाँगच्या ली च्युक यिउविरुद्ध २२-२२, १५-२१ अशा फरकाने पराभव पत्करावा लागला, तर आयुष शेट्टीने जागतिक अव्वल मानांकित शी यू क्यूविरुद्ध कडवी झुंज दिली, मात्र त्याचे आव्हानही १८-२१, २१-१८, १२-१२ अशा फरकाने संपुष्टात आले.

# विजय हजारे ट्रॉफीत आता क्वार्टर फायनलचा थरार

**मुंबई : प्रतिनिधी**

देशांतर्गत क्रिकेटमधील प्रतिष्ठित विजय हजारे ट्रॉफी स्पर्धेतील २०२५-२६च्या हंगामातील साखळी फेरीतील लढती संपल्या. एलिट गटातील ३२ संघातून चार गटातून प्रत्येकी दोन संघानी क्वार्टर फायनलमध्ये जागा पक्की केली आहे.

**आठ संघ भिडणार**

विजय हजारे ट्रॉफी स्पर्धेतील क्वार्टर फायनलच्या लढती १२ आणि १३ जानेवारीला बीसीसीआयच्या बंगळुरूस्थित सीओईच्या मैदानात खेळवण्यात येणार आहेत. कर्नाटक, मुंबई, उत्तर प्रदेश, सौराष्ट्र, पंजाब, मध्य प्रदेश दिल्ली आणि विदर्भ या संघांनी बाद फेरीत प्रवेश केला आहे. क्वार्टर फायनलमधील विजेता संघ सेमी फायनलसाठी पात्र ठरेल. या स्पर्धेतील अंतिम सामना १८ जानेवारीला नियोजित आहे.

**कोणता संघ कधी आणि कुणाविरुद्ध भिडणार?**

**क्वार्टर फायनल १ :** कर्नाटक विरुद्ध मुंबई, १२ जानेवारी, सकाळी ९ वाजता, बंगळुरू

**क्वार्टर फायनल २ :** उत्तर प्रदेश विरुद्ध सौराष्ट्र, १२ जानेवारी, सकाळी ९ वाजता, बंगळुरू

**क्वार्टर फायनल ३ :** पंजाब विरुद्ध मध्य प्रदेश, १३ जानेवारी, सकाळी ९ वाजता, बंगळुरू

**क्वार्टर फायनल ४ :** दिल्ली विरुद्ध विदर्भ, १३ जानेवारी, सकाळी ९ वाजता, बंगळुरू

## रोहित-विराटची एन्ट्री होताच गंभीर अवाक्!

**वडोदरा :** भारत आणि न्यूझीलंड या दोन्ही संघांमध्ये वनडे आणि टी-२० सामन्यांचा थरार रंगणार आहे. वनडे मालिकेतील पहिला सामना ११ जानेवारीला वडोदरा येथे खेळवला जाईल. विराट कोहली आणि रोहित शर्माची एक झलक पाहण्यासाठी चाहत्यांनी गर्दी केली होती. मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीरला ही क्रेझ पाहून आश्चर्याचा धक्का बसला.

व्हायरल व्हिडिओमध्ये विराट-रोहितला बसमध्ये पाहून चाहते जल्लोष करत होते, त्यावेळी गंभीर आश्चर्यचकित झाल्याचे दिसून येत आहे.

# मैदानावरच फलंदाजाचा मृत्यू



**आयझॉल : वृत्तसंस्था**

मिजोरमचे माजी रणजी क्रिकेटपटू के. लालरेमरूआटा यांचे गुरुवारी क्रिकेट मैदानावरच निधन झाले. स्थानिक क्रिकेट सामन्यादरम्यान हृदयविकाराचा झटका आल्याने त्यांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती आहे. या घटनेमुळे मिजोरमसह संपूर्ण क्रिकेट वर्तुळात शोककळा पसरली आहे.

३८ वर्षीय लालरेमरूआटा एका स्थानिक स्पर्धेत वेंगनुआई रेडर्स क्रिकेट क्लबकडून खेळत होते. फलंदाजी आटोपल्यानंतर ते पॅव्हेलियनकडे परतत असताना अचानक त्यांची तब्येत बिघडली अन् ते मैदानावरच कोसळले. त्यांना तत्काळ रुग्णालयात नेण्यात आले, मात्र डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. सुरुवातीच्या माहितीनुसार हृदयविकाराचा झटका हे मृत्यूचे कारण असल्याचे सांगण्यात येत आहे. के. लालरेमरूआटा हे मिजोरम क्रिकेटमधील एक परिचित आणि आदरणीय नाव राहिले आहे. त्यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त होत आहे.

# बांगलादेश क्रिकेट मंडळाचे आयसीसीला पुन्हा पत्र

**दुबई : वृत्तसंस्था**

बांगलादेश क्रिकेट मंडळाने (बीसीबी) आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेला (आयसीसी) औपचारिकपणे दुसरे पत्र पाठवून आगामी ट्वेन्टी-२० विश्वचषक स्पर्धेसाठी भारतात प्रवास करण्याबाबत सुरक्षाविषयक चिंतेचे स्पष्टीकरण दिले तसेच स्पर्धेतील सामने भारतातून श्रीलंकेत हलविण्याच्या आपल्या विनंतीचा पुनरुच्चार केला.

ट्वेन्टी-२० विश्वचषक स्पर्धेला ७ फेब्रुवारीपासून सुरुवात होणार असून बांगलादेशचे तीन सामने कोलकाता, तर एक सामना मुंबई येथे नियोजित आहे. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या (बीसीसीआय) सूचनेनंतर आयपीएल संघ कोलकाता नाइट रायडर्सने बांगलादेशचा वेगवान गोलंदाज मुस्तफिझूर रहमानला संघमुक्त केले. या पार्श्वभूमीवर बांगलादेशातील हंगामी सरकार आणि बीसीबीने आक्रमक भूमिका घेताना, आगामी ट्वेन्टी-२० विश्वचषक स्पर्धेसाठी आपला संघ भारतात पाठविण्यास नकार दिला. सामने सह-यजमान असलेल्या श्रीलंकेत खेळविण्याची बीसीबीने आयसीसीकडे विनंती केली, मात्र ती अमान्य करण्यात आली. त्यानंतर बीसीबीने आयसीसीला पुन्हा पत्र लिहिले आहे.

क्रीडा मंत्रालयाचे सल्लागार आसिफ नझरूल यांच्याशी चर्चा केल्यानंतर बीसीबीने पुन्हा एकदा आयसीसीला पत्र पाठवले आहे. सुरक्षेच्या दृष्टीने चिंतेचे विषय कोणते आहेत हे आयसीसीला जाणून घ्यायचे होते आणि बीसीबीने ते नव्या पत्रात नमूद केले आहेत, असे क्रिकेट मंडळाशी संबंधित सूत्राने वृत्तसंस्थेला सांगितले.


**पाहिजेत**

कॉम्प्युटर ऑपरेटर

ऑफिस असिस्टंट

मार्केटिंग एक्झिक्युटिव्ह

डिलीव्हरी पिकअप बॉय

पत्ता :- स्मार्ट कुरियर सर्व्हिस प्रा.लि. ऑफिस नं २४ विध्या कमरशियल कॉम्लेक्स सेक्टर ११, सी.बी.डी बेलापूर, मो. ९९३००२३५५२


दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com